cmyk

## संपादकीय

### भारतात 'टॅलेंट' आहे पण वापराचे काय?

राजकारणाच्या गलबल्यात अर्थकारणाकडे नेहमीच दुर्लक्ष केले जाते, ही वस्तुस्थिती आहे. निदान भारतात तरी असे होते. केवळ राजकीय पक्षच नव्हे, तर स्वतःला निःपक्षपाती म्हणवून घेणाऱ्या पण प्रत्यक्षात कोणत्या ना कोणत्या राजकीय पक्षाची तळी उचलून धरणाऱ्या वृत्तसंस्थांनाही राजकारण हाच विषय विनाकारण अधिक प्रिय असतो. प्रत्येक बाबतीत राजकारण करण्याच्या आणि आणण्याच्या या प्रवृत्तीमुळे भारताची गेल्या ७० ते ८० वर्षांच्या काळात प्रचंड हानी झाली आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अत्यंत चुकीची आणि आतबट्ट्याची आर्थिक धोरणे स्वीकारली गेल्याने भारताचा आर्थिक पायाच भुसभुशीत राहिला.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... ©email:rajyaloktantra75@gmail.com


### शरद पवार बदलणार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष

मुंबईः विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला अपेक्षित यश मिळाले नसल्यामुळे या पक्षात प्रदेशाध्यक्ष बदलाच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. पक्षाध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत ९ जानेवारीस होणाऱ्या बैठकीत या संबंधात निर्णय होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सभागृहात ही बैठक होणार आहे. शरद पवार यांच्या पक्षाला लोकसभा निवडणुकीत आठ जागांवर विजय मिळाला होता. त्यामुळे विधानसभा निवडणुकीतही हा पक्ष दमदार कामगिरी करेल, असा अंदाज बांधण्यात आला होता. विधानसभा निवडणुकीत या पक्षाला किमान ४० ते ५० जागांवर सहज विजय मिळेल, असे स्पष्ट होते.

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२४५ | शनिवार, दि.२८ डिसेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

# सौर कृषी पंप बसवण्यात महाराष्ट्र देशात अव्वल

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून शेतकरी होताहेत स्वावलंबी

**मुंबई । प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेच्या अंमलबजावणीवर भर दिला आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा दीर्घ काळाचा पेड पेंडिंगचा प्रश्न सोडविण्याचा निर्धार त्यांनी केला आहे. राज्यामध्ये महावितरणच्या माध्यमातून डिसेंबर महिन्यात दि.२६ पर्यंत २१,९५१ सौर कृषी पंप बसविण्यात आले. अर्थात दररोज सरासरी ८४४ पंप बसविण्यात आले. ही आतापर्यंतची कोणत्याही महिन्यातील सर्वाधिक सरासरी आहे. या बरोबरच महाराष्ट्राने सौर कृषी पंप बसवण्यात देशात पहिला क्रमांक पटकविला आहे.**



### शेतकरी भरतो केवळ १० टक्के

मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनेत शेतकऱ्यांना प्रधानमंत्री कुसुम योजनेच्या अंतर्गत केंद्र सरकारकडून ३० टक्के तर राज्य सरकारकडून ६० टक्के अनुदान मिळते. त्यामुळे केवळ दहा टक्के रक्कम भरून सिंचनासाठी कृषी पंपासह संपूर्ण संच मिळतो. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना केवळ ५ टक्के लाभार्थी हिस्सा भरावा लागतो.

शेतकऱ्यांना केवळ दहा टक्के रक्कम भरून सौर पॅनेल्स आणि कृषी पंप असा संपूर्ण संच देण्याच्या 'मागेल त्याला सौर कृषी पंप' या योजनेच्या अंमलबजावणीला गती आली आहे. डिसेंबर महिन्यात दररोज सरासरी ८४४ पंप राज्यात बसविण्यात आले, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली. राज्यात २०१५ पासून २०२३ पर्यंत विविध योजनेत १ लाख ८० हजार सौर पंप बसविण्यात आले होते. तथापि, या वर्षी मार्च २०२४ पासून आतापर्यंत फक्त आठ महिन्यांच्या कालावधीत राज्यात १ लाख ५८ हजार सौर पंप बसविण्यात आले आहेत. संपूर्ण देशात महाराष्ट्राने सर्वाधिक सौर पंप बसविण्याचा उच्चांक गाठला आहे. राज्य सरकारने फेब्रुवारी महिन्यात अर्थसंकल्पात ◀◀ पान २ वर

### परळीत गळफास लावून एका युवकाची आत्महत्या

परळी वै.: शहरातील आनंदनगर, पद्मावतीगल्ली भागात संत नरहरी महाराज मंदिर परिसरातील रहिवासी एका युवकाने राहत्या घरातच गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना दि.२७ रोजी मध्यरात्रीनंतर घडली आहे. याप्रकरणी पो.स्टे. संभाजीनगर येथे आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि.२७ रोजी मध्यरात्रीनंतर २ वा. सुमारास मयत युवकाने घरातीलच लोखंडी हुकाला गळफास लावून आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले. मनोज मारोती काळे वय ४१ वर्षे असे मयताचे नाव आहे. दारुच्या नशेत त्याने ही आत्महत्या केली असल्याचे कारण पोलिसात दिलेल्या प्रथम खबरीत देण्यात आलेले आहे. याप्रकरणी पो.स्टे. संभाजीनगर येथे आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. अधिक तपास सहाय्यक फौजदार सौंदनकर हे करीत आहेत.

# संतोष देशमुख यांच्या न्यायासाठी आज बीडकर रस्त्यावर

## सर्वपक्षीय मुकमोर्चा; शरद पवार, जितेंद्र आव्हाड, अंजली दमानियांसह नेते सहभागी होणार



**बीड । प्रतिनिधी**

**संतोष देशमुख खून प्रकरणाचे पडसाद राज्यात उमटल्यानंतर जनतेमध्ये खूप मोठ्या प्रमाणात रोष आहे. संतोष देशमुख यांना न्याय मिळावा यासाठी दि. २८ डिसेंबर रोजी बीडमध्ये मुकमोर्चा निघणार आहे. हा मोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक–साठे चौक–शिवाजी महाराज चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय असा निघणार असून या मोर्चात शरद पवार, जितेंद्र आव्हाड, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया, खा. बजरंग सोनवणे, आ. सुरेश धस, आ. प्रकाश सोळंके, आ. विजयसिंह पंडीत, आ. संदिप क्षीरसागर यांच्यासह राज्यातील मोठे नेते सहभागी होणार आहेत.**

संतोष देशमुख यांचे ९ डिसेंबर रोजी अगोदर अपहरण करून नंतर त्यांचा खून झाला. खूनानंतर ◀◀ पान २ वर

### सुरेश धस काय गौप्यस्फोट करणार?

जिल्हाधिकारी आणि पोलिस अधिक्षक यांना भेटल्यावर आ. सुरेश धस यांनी धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांच्यावर बरेच गंभीर आरोप केले. सिरसाळा गायरान, कराड यांची जमीन यासह त्यांनी विविध मुद्दे मांडले. २८ तारखेच्या मुकमोर्चात आपण बरेच बोलणार असल्याचे त्यांनी सांगितले असून ते यावेळी काय गौप्यस्फोट करणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## सुरेश धस यांनी प्राजक्ता माळीचे नाव दोनवेळा घेतले

### पोलिस अधिक्षकांच्या भेटीनंतर धनंजय मुंडेबाबत वक्तव्य





बीडः अभिनेत्री प्राजक्ता माळी या आमच्याकडे येतात. प्राजक्ता ताईंचा अतिशय जवळचा पत्ता सापडायचा असेल तर आमचा परळी पॅटर्न आहे, असे वक्तव्य भाजपचे आमदार सुरेश धस यांनी केले. बीड जिल्ह्यात आकांची १०० ते १५० एकर जमीन आहे. त्यांनी आपल्या जमिनीत ३० ते ४० कोटी रुपयांचे बंधारे बांधून घेतले आहेत. आकांकडे पाच वर्षात एवढा पैसा आला कुठून? आम्ही परळीत बघत असतो, रश्मिका मंधाना, सपना चौधरी येत असतात. ज्यांना इव्हेंट मॅनेजमेंट पॉलिटिक्सचं शिक्षण घ्यायचे असेल त्यांनी परळीत यावे. प्राजक्ता माळीही आमच्याकडे येत असतात. त्यांचा अतिशय जवळचा पत्ता सापडायचा असेल तर आमचा परळी पॅटर्न बघितला पाहिजे, असे सुरेश धस यांनी म्हटले. सुरेश धस यांनी शुक्रवारी बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांची भेट घेतली. त्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना सुरेश धस यांनी खळबळजनक आरोपांची राळ उडवून दिली.

## धनंजय मुंडेंना टार्गेट करण्याची सुरेश धसांनी सुपारी घेतली

### अमोल मिटकरी यांचा गंभीर आरोप; मंत्रीपद न मिळाल्याने पोटसुळ उठला

#### मिटकरी, माझ्या नादी लागू नको–आ. धस

अमोल मिटकरी यांना आ. सुरेश धस यांनी त्यांच्या खास शैलीत प्रतिउत्तर दिले आहे. अमोल मिटकरी फार लहान आहे, माझ्या नादी लागू नको, पुन्हा नादी लागलास तर लई अवघड होईल, असा सज्जड दम आ. सुरेश धस यांनी मिटकरी यांना दिला. तसेच मिटकरी पहिल्यांदा बोलले म्हणून माफ करतो, असेही ते म्हणाले. मात्र धसांच्या प्रतिउत्तरानंतर मिटकरींनी पुन्हा समाज माध्यमांवर त्यांना उत्तर दिले आहे.

**पुणे । प्रतिनिधी**

**विधानसभा निवडणुकीत मोठ्या मताधिक्याने निवडूण आल्यावर आपल्याला मंत्रीपद मिळेल, असे आ. सुरेश धसांना वाटत होते. मात्र मुंडे बहिण–भावाला मंत्रीपद मिळाल्याने त्यांच्या पोटात पोटसुळ उठला असल्याचे सांगून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते अमोल मिटकरी म्हणाले, धनंजय मुंडे यांना टार्गेट करण्यासाठी आ. सुरेश धसांनी सुपारी घेतली आहे का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.**



संतोष देशमुख खून प्रकरणानंतर मंत्री धनंजय मुंडे यांना वारंवार आ. सुरेश धस यांच्याकडून वेगवेगळ्या मुद्द्यावर टार्गेट केले जात असल्याचे म्हटले जात आहे. त्यातच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रवक्ते अमोल मिटकरी यांनी धस यांच्यावर जोदार टिका केली आहे. मिटकरी म्हणाले, मुंडे बहिण–भाऊ ◀◀ पान २ वर

## एकाच व्यक्तीच्या नावावर ९ अब्ज रुपयांचे व्यवहार

### आ.सुरेश धसांचा आरोप; महादेव ॲपचे मलेशिया कनेक्शन

सुरेश धस यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना महादेव बेटिंग ॲप प्रकरणात गुंतलेल्या बीडमधील एका व्यक्तीचा उल्लेख केला. हे प्रकरण गंभीर आहे. या प्रकरणात दोन अधिकारी होते. या व्यक्तीच्या नावावर ९ अब्ज रुपयांचा व्यवहार झाला आहे. १०० कोटी रुपयांच्या पुढे आर्थिक गैरव्यवहार असल्यास ईडीकडून तपास केला जातो. पण ९ अब्ज रुपयांच्या आर्थिक व्यवहाराच्या तपासासाठी तुम्ही कोणती यंत्रणा आणणार? महादेव बेटिंग ॲपच्या माध्यमातून बीड जिल्ह्यात जो घोटाळा झाला त्यामध्ये चांगले पोलीस ◀◀ पान २ वर

#### सिरसाळ्यातील अवैध विटभट्टीवर धसांचा हातोडा

परळी तालुक्यातील सिरसाळा या गावात ६०० विटभट्टा आहेत. तर गावच्या शिवारात १४०० एकर गायरान जमीन असून त्यावर ३०० अवैध विटभट्टा आहेत. त्या कोणाच्या आशिर्वादाने सुरु आहेत, हे सर्वांना माहित आहे. याबाबत आता मी रितसर तक्रार करणार असल्याचे सांगून आ. सुरेश धस म्हणाले. बंजारा आणि पारधी समाजाकडून गायरान जमीनी हिसकावून घेतल्या असून तेथून त्यांना हाकलून लावले आहे. धस यांनी सिरसाळा येथील अवैध विटभट्टांवर हातोडा हाणल्याने येणाऱ्या काळात या विटभट्ट्यांवर संक्रात येणार असल्याचे संकेत आहेत.

#### २०१४ पासून एकास मतदार संघाला डीपीडीसीचा ७० टक्के निधी

मुंडे बहिण–भावावर पुन्हा आ. सुरेश धस यांनी हल्लाबोल केला. २०१४ पासून २०२४ पर्यंत डिपीडीसीच्या निधीपैकी ७० टक्के निधी हा एकाच मतदार संघाला दिला जात असून उर्वरित ३० टक्के निधीमध्ये पाच मतदार संघ होते, असा आरोप आ. धस यांनी केला.

#### पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांची यादी मागवली

जिल्ह्यात बिंदुनामावलीनुसार कर्मचारी संख्या नसून पोलिस प्रशासनात विशिष्ट लोकांचा भरणा मोठा आहे. त्यामुळे पोलिस प्रशासनाला मी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची यादी मागवली असून बिंदुनामावलीनुसार संख्या नसेल तर त्यावर कार्यवाही करण्याच्या सुचना देणार असल्याचे आ. सुरेश धस यांनी म्हटले आहे.

### रासायनिक खतांच्या किमतीत भर

पुणे : आधीच महागाईने त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना नव्या वर्षात वाढणाऱ्या खतांच्या किमतीला सामोरे जावे लागणार आहे. हवामान बदलामुळे शेतकऱ्यांना अगोदरच आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, त्यातच आता वाढणाऱ्या रासायनिक खतांमुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत भर पडणार आहे. खरीप हंगामात झालेले नुकसान कसे भरून काढावे, हा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत असतानाच अचानक रासायनिक खतांचे भाव वाढल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. रासायनिक खतांच्या किमती आधीच जास्त असताना ◀◀ पान २ वर

### कैलास फडला जामीन

बीड–हवेत गोळीबार प्रकरणी अटक केल्यावर २४ तासात कैलास फड यास ५० हजाराच्या जातमुचलक्यावर जामीन देण्यात आला आहे. अंजली दमानिया आणि शिवसेना जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर यांनी कैलास फड याचा तो हवेतील गोळीबाराचा व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल केला होता. त्यानंतर त्याच्यावर गुन्हा दाखल होऊन त्यास अटक केले होते.

### विष्णु चाटेला ६ जानेवारीपर्यंत पोलिस कोठडी

बीड–संतोष देशमुख खून प्रकरणात हत्येचा कट रचल्याचा आरोप असलेल्या विष्णु चाटेची सीआयडीने शुक्रवार कसून चौकशी केल्याचे समजते. तसेच त्यास केज न्यायालयासमोर हजर केले असता त्यास ६ जानेवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

### मुंडे, सुरेश धस, आव्हाड, क्षीरसागर हे सगळे सारखेच–दमानिया

मुंबई–बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीबाबत राज्यभरातून प्रतिक्रिया येत असून सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी सुध्दा यावर आपले परखड मत व्यक्त केले होते. त्यानंतर त्यांनी मुकमोर्चाच्या पार्श्वभुमीवर वक्तव्य केले असून त्या म्हणाल्या, धनंजय मुंडे काय आणि सुरेश धस, जितेंद्र आव्हाड, संदिप क्षीरसागर काय हे सगळे सारखेच आहेत. एकालाच टार्गेट करुन काय उपयोग होणार आहे, असे त्या म्हणाल्या. पुढे बोलताना दमानिया म्हणाल्या, आज धनंजय मुंडे राजकारणात यशस्वी झाले आहेत. पण वंजारी समाजात दुसरे दोन लोक दाखवा जे त्यांच्या ऐवढे श्रीमंत आहेत. सुरेश धस हे पैलवान सांभाळतात, त्यांना खाऊ–पिऊ घालतात, पुढे त्यांचा निवडणुकात वापर करुन घेतात. संदिप क्षीरसागर यांच्या हाती पिस्तुल असणारे अनेक फोटो माझ्याकडे आले आहेत. तर मुंब्रा कळवामध्ये जितेंद्र आव्हाड काय करतात, हे सर्वांना माहित आहे. अडीच वर्षापुर्वी धनंजय मुंडे हे शरद पवारांच्या पक्षात होते. मग त्यावेळी आव्हाडांना दिसत नव्हते का? असा प्रश्न उपस्थित करीत दमानिया म्हणाल्या, धनंजय मुंडे, सुरेश धस, जितेंद्र आव्हाड आणि संदिप क्षीरसागर हे सगळे सारखेच आहेत.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२७ डिसेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २.५० क्विंटल | २,६०० | २,६०० | २,६०० |
| ज्वारी/हायब्रिड: १९.०० क्विंटल | २,१०१ | २,३९५ | २,२३० |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : ४१.०० क्विंटल | ६,७०१ | ७,५०० | ७,५०० |
| उडीद : १.०० क्विंटल | ७,२०० | ७,२०० | ७,२०० |
| बाजरी: ४.०० क्विंटल | २,८०० | ३,५०० | ३,०७८ |
| मुग : ६.५० क्विंटल | ६,९१० | ६,९१० | ६,९१० |
| सोयाबीन: ७७.५० क्विंटल | ४,०७१ | ४,१११ | ४,०९४ |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ५,८०० | ५,८०० | ५,८०० |

## मुख्यमंत्र्यांनी लोकार्पण केलेली उपबाजार पेठ बेकायदा कशी

### सुर्यभान मुंडे यांचा आ.सुरेश धस यांना सनसनाटी सवाल

**परळी वै. । प्रतिनिधी**

**परळी बाजार समितीच्या माध्यमातून धनंजय मुंडे यांची तसेच बाजार समितीची खोटी बदनामी आमदार सुरेश धस करत असून सिरसाळा येथे उभारण्यात आलेले स्व.पंडित अण्णा मुंडे व्यापारी संकुल हे पूर्णतः शासकीय नियमांचे पालन करून व बाजार समितीच्या मालकी हक्काच्या जागेतच केलेले आहे. त्यामुळे सुरेश धस यांनी यासंदर्भात केलेले सर्व आरोप बिनबुडाचे व खोटे असून केवळ बदनामी करण्यासाठी केले आहेत, असे प्रत्युत्तर परळी बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे यांनी दिले आहे.**



कृषी उत्पन्न बाजार समिती परळी वैजनाथ चे उपबाजार पेठ सिरसाळा येथे सर्वे नंबर ३४३ मध्ये २० एकर जमीन ही बाजार समितीच्या मालकीची आहे, या मालकीच्या जागेवर भव्य असे ९३ गाळ्यांचे कै. पंडितअण्णा मुंडे व्यापारी संकुल सर्व रीतसर परवानगी घेऊन बांधण्यात आलेले आहे व याचे दिनांक ५/१२/२०२३ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, तसेच अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री मा. ना. अजितदादा पवार व कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आलेले आहे. त्यामुळे आमदार सुरेश धस यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बाबतीत दिलेली सर्व माहिती खोटी व बिनबुडाची आहे अशी माहिती सभापती सूर्यभान नाना मुंडे यांनी दिली. तसेच ऐकीव माहितीच्या आधारे बिनबुडाचे आरोप त्यांनी न करता भानावर यावे, असेही सूर्यभान मुंडे यांनी म्हटले आहे. जिल्हाधिकारी बीड यांचे दिनांक ०२/०९/१९८५ च्या आदेशानुसार उपबाजार पेठ सिरसाळा येथील २० एकर जमीन कृषी उत्पन्न बाजार समिती माजलगाव यांना रीतसर हस्तांतरित केलेली होती, नवीन परळी तालुका झाल्यानंतर तालुका पुनर्रचनेनुसार ◀◀ पान २ वर

## मराठी पत्रकार परिषदेच्या राज्य उपाध्यक्षपदी गणेश मोकाशे

**मुंबई । प्रतिनिधी**

**मराठी पत्रकार परिषदेच्या राज्य उपाध्यक्ष पदासाठी पश्चिम महाराष्ट्र विभागातून दैनिक लोकतंत्रचे संपादक गणेश मोकाशे यांची निवड करण्यात आली असून, या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.**



मराठी पत्रकार परिषदेच्या उपाध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. ऑगस्ट २०२६ पर्यंत नवे उपाध्यक्ष कार्यरत असतील. विभागीय चिटणीस आणि उपाध्यक्षांनी विभागात संघटनात्मक काम वाढविण्याची जबाबदारी त्यांच्यावर असेल. नवे उपाध्यक्ष पुढील प्रमाणे आहेत. पश्चिम महाराष्ट्र : गणेश मोकाशे, संपादक राज्य लोकतंत्र (पुणे), कोकण विभागः हेमंत वणजू, रत्नागिरी, मराठवाडा : प्रकाश कांबळे, (नांदेड), उत्तर महाराष्ट्र :गो. पी. लांडगे, (धुळे), विदर्भ : अविनाश भांडेकर, (गडचिरोली) आणि चंद्रकांत बर्डे (बुलढाणा). सर्व नवीन उपाध्यक्षांचे एस.एम.देशमुख, विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई, डिजिटल मिडियाचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे, राज्य प्रसिध्दीप्रमूख संदीप कुलकर्णी, संभाजीनगरचे विभागीय सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# भारतात 'टॅलेंट' आहे पण वापराचे काय?

राजकारणाच्या गलबल्यात अर्थकारणाकडे नेहमीच दुर्लक्ष केले जाते, ही वस्तुस्थिती आहे. निदान भारतात तरी असे होते. केवळ राजकीय पक्षच नव्हे, तर स्वत:ला नि:पक्षपाती म्हणवून घेणाऱ्या पण प्रत्यक्षात कोणत्या ना कोणत्या राजकीय पक्षाची तळी उचलून धरणाऱ्या वृत्तसंस्थांनाही राजकारण हाच विषय विनाकारण अधिक प्रिय असतो. प्रत्येक बाबतीत राजकारण करण्याच्या आणि आणण्याच्या या प्रवृत्तीमुळे भारताची गेल्या ७० ते ८० वर्षांच्या काळात प्रचंड हानी झाली आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अत्यंत चुकीची आणि आतबट्ट्याची आर्थिक धोरणे स्वीकारली गेल्याने भारताचा आर्थिक पायाच भुसभुशीत राहिला. भारताला स्वातंत्र्य मिळाले, त्याच काळात इतर अनेक देशही स्वतंत्र झाले होते, किंवा त्यांचा पुनरोदय झाला होता. भारताच्या स्वातंत्र्यानंतर बऱ्याच काळाने अनेक देश उदयास आले होते. त्यांच्यापैकी कित्येक देश आज आर्थिकदृष्ट्या भारतापेक्षा कितीतरी पुढे गेले आहेत. १९५० मध्ये जगाच्या अर्थव्यवस्थेत भारताचा वाटा साधारणत: ३.५ टक्के होता. आजही तो त्याच पातळीवर आहे. याउलट १९५० मध्ये आर्थिकदृष्ट्या भारताच्या मागे असणारा चीन आज भारताच्या किमान चारपट आघाडीवर असून त्याचा जगाच्या अर्थव्यवस्थेतील वाटा जवळपास १५ टक्के आहे.

१९९१ मध्ये आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम हाती घेतल्यानंतर आपल्या अर्थव्यवस्थेची काहीशी प्रगती झाली. तरीही आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम म्हणावा तसा वेगाने पुढे गेलेला नाही. याला कारण राजकारणाला अर्थकारणापेक्षा अधिक महत्त्व देण्याची प्रवृत्ती हेच आहे. जागतिक बँक या संस्थेचे एक अर्थशास्त्रज्ञ इंदरमित गिल यांनी नुकतेच एक विधान केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार भारताला खऱ्या अर्थाने विकसीत देश म्हणून पुढे यायचे असेल, तर त्याच्याकडे आता केवळ २० वर्षांचा अवधी राहिला आहे. त्यानंतर भारताला संधी मिळणे अवघड आहे. कारण इतर देशही झपाट्याने पुढे जात असून त्यांच्या स्पर्धेत आणखी २० वर्षांनंतर टिकून राहणे भारताला अशक्य होईल. गिल यांनी त्यांचा मुद्दा स्पष्ट करताना, चीनचेच उदाहरण दिले आहे, पण ते सकारात्मक दृष्टीने दिले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार आजही भारताने मनापासून प्रयत्न केले तर पुढच्या दोन दशकांमध्ये त्याची आर्थिक प्रगती झपाट्याने होऊ शकेल. ती क्षमता किंवा पोटॅन्शिअल्स भारताकडे आजही आहे. चीनच्या तुलनेत भारताची अर्थव्यवस्था अधिक समतोल आहे. चीनइतका भारत निर्यातीवर अवलंबून नाही. आर्थिक विकास दर आणि बाजारात होणारा वस्तू आणि सेवांचा खप हे गुणोत्तर भारतात अधिक सुस्थिर आहे. भारताची अर्थव्यवस्था आज जगात सर्वात अधिक वेगाने वाढत आहे. चीनचा विकास मधल्या काळात राक्षसी वेगाने झाला. हा वेग आता त्या देशाला सोसवेनासा झाला आहे. भारताची प्रगती मात्र चीनच्या तुलनेत संथगतीने पण सुस्थिर पद्धतीने होत आहे. इतकेच नव्हे, तर आज जागतिक राजकीय स्थितीही चीनपेक्षा भारताला अधिक अनुकूल आहे. या सर्व देशांतर्गत आणि जागतिक अनुकूलतेचा लाभ अधिक प्रमाणात उठविता येणे भारताला शक्य आहे. तथापि, हा लाभ घ्यायचा असेल, तर भारताला आतापासूनच वेगाने हालचाली कराव्या लागतील. आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम पुढे न्यावा लागेल. नवे तंत्रज्ञान आणि नवी गुंतवणूक यांच्यासाठी आपले दरवाजे मोकळे ठेवावे लागतील. आर्थिक प्रगतीच्या आड येणारे जाचक कायदे, अडथळे (बॉटलनेक्स) हटवावे लागतील, असे गिल यांचे म्हणणे आहे. हे म्हणणे तसे नवे नाही. याची चर्चा भारतात बऱ्याच काळापासून होत आहे. भारतामध्ये मोठ्या प्रमाणात तंत्रवैज्ञानिक, शास्त्रीय, औद्योगिक आणि आर्थिक 'टॅलेंट' आहे, हे सर्वांना माहीत आहे.

आपले बुद्धीमान लोक परदेशी जातात तेव्हा तेथे ते या सर्व क्षेत्रांमध्ये शिखरावर पोहचून नाव कमावतात. मग भारतात ते असे का करु शकत नाहीत? याचे कारण असे, की भारतात गुणवत्तेपेक्षा अन्य असंबंध निकष अधिक प्रमाणात मानले जातात. गुणवत्तेला शेवटचे स्थान मिळते. याचे मुख्य कारण हे की, प्रत्येक स्थानी राजकारणाला प्राथमिकता दिली जाते. आपली सर्व धोरणे 'सत्तास्वार्थ' या एकाच केंद्राभोवती फिरत राहतात.

आजही सर्व राजकीय मतभेद आणि सत्तास्वार्थ विसरुन केवळ देशाची आर्थिक प्रगती या एकाच मुद्द्याला प्राधान्य मिळाले, तर येत्या दोन दशकांमध्ये पूर्वीचा 'बॅकलॉग' भरुन काढला जाऊ शकतो, असा इंदरमित गिल यांच्या म्हणण्याचा मथितार्थ आहे. तो आपल्या सत्ताधाऱ्यांनी नीट समजून घेणे आवश्यक आहे. राजकीय साठमारीचा फटका आपली अर्थव्यवस्था यापुढे अधिक काळ सहन करु शकणार नाही. वेळ निघून गेली तर नंतर हालाखीची परिस्थिती निर्माण होईल, असा अप्रत्यक्ष इशाराच गिल यांनी दिला आहे. त्यामुळे राजकीय पक्ष आणि जनता यांनी सावध होणे आवश्यक आहे.

# ना.पंकजाताई मुंडे यांचे पाच वर्षांनंतर मंत्रालयात आगमन

## मंत्रालयातील दालनात आजपासून सुरू केले कामकाज



मुंबई । प्रतिनिधी

**पर्यावरण व वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचे आज मंत्रालयातील त्यांच्या दालनात पाच वर्षानंतर आगमन झाले. माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे ठरलेले सर्व कार्यक्रम रद्द करण्यात आल्याने अत्यंत साधेपणाने मंत्री श्रीमती मुंडे यांनी मंत्रालयातील त्यांच्या दालनात पदभार स्वीकारून कामकाजाची सुरुवात केली.**

यावेळी मंत्री श्रीमती मुंडे यांनी प्रथम गणेशाची पुजा करून स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेचे दर्शन घेतले. तसेच छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना अभिवादन केले. यावेळी मंत्री कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# सीआयडी ॲक्शन मोडमध्ये : कराडांची पत्नी, बॉडीगार्डची चौकशी

## राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांनाही बोलावले

बीड । प्रतिनिधी

**सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणावरुन राज्याचे वातावरण चांगलेच तापलें असून या घटनेचा निषेध केला जात आहे. ही घटना घडून अनेक दिवस उलटले आहेत,मात्र, या घटनेचा मुख्य सूत्रधार फरार आहे. घटनेविरोधात उद्या बीडमध्ये सर्वपक्षीय नेत्यांच्यावतीने मूक मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. त्याअगोदरच या प्रकरणाच्या तपासाला वेग आला आहे. सीआयडीने वेगवान सूत्रे हलवण्यास सुरुवात केली असून वाल्मिक कराडच्या पत्नीला चौकशीसाठी पोलिस स्थानकात बोलवले आहे.**

संतोष देशमुख हत्या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडेंचे निकटवर्तीय वाल्मिक कराड हे विरोधकांच्या निशाण्यावर आले आहेत. वाल्मिक कराड या प्रकरणाचा मास्टरमाईंड असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. पोलिसांनी वाल्मिक कराडवर केवळ खंडणी प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. वाल्मिक कराड सध्या फरार असून पोलीस त्याच्या मागावर आहेत. यासाठी सीआयडीने वाल्मिक कराडच्या पत्नीला पोलीस स्थानकात बोलवले आहे. सीआयडीकडून बीड शहर पोलीस ठाण्यात वाल्मिक कराडच्या पत्नीची कसून चौकशी सुरु आहे. वाल्मिक कराडच्या पत्नीबरोबर राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांना लातूरमधून चौकशीसाठी बीड शहर पोलीस स्टेशनला आणले आहे. गेल्या दीड तासापासून चौकशी सुरू आहे. वाल्मिक कराड यांचे दोन्ही बॉडीगार्डला चौकशीसाठी बोलावलं आहे. वाल्मिक कराड हे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडेंचे अत्यंत जवळचे मानले जातात. विशेष म्हणजे धनंजय मुंडेंनीही ते नाकारलं नाही. पण या प्रकरणी जाणीवपूर्वक गोवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा धनंजय मुंडेंचा आरोप आहे. तर मुंडेंशी असलेल्या जवळीकीमुळेचं कराडवर पोलिसांकडून कारवाई केली जात नसल्याचं विरोधकांचं म्हणणं आहे. संतोष देशमुखांच्या हत्या प्रकरणात एकूण सात आरोपींविरोधात केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जयराम चाटे, महेश केदार, प्रतीक घुले, विष्णू चाटे या चौघांना पोलिसांनी अटक केली आहे. तर सुदर्शन घुले, कृष्णा आंधळे आणि सुधीर सांगळे हे तिघेजण फरार आहेत. इकडं खंडणी प्रकरणी पोलिसांनी खंडणी विष्णू चाटेला अटक केली आहे. तर वाल्मिक कराड आणि सुदर्शन घुलेंचा पोलिसांकडून शोध घेतला जात आहे.

# विद्यापीठ केंद्रीय युवक महोत्सवामध्ये कडा येथील गांधी महाविद्यालयाच्या बीसीए विद्यार्थ्यांचे प्रहसन सादरीकरण

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

डॉ .बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर येथे २५ डिसेंबर पासून केंद्रीय युवक महोत्सव २०२४ २५ ला शोभायात्रेने सकाळी नऊ वाजता महोत्सवात सुरुवात झाली या महोत्सवात कडा येथील गांधी महाविद्यालयाच्या बीसीएच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे या विद्यार्थ्यांनी प्रहसन कला प्रकार सादर केला आहे या प्रहसनाला प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली हे प्रहसन म्हणजे समाजाचा आरसा आहे विद्यार्थ्यांना योग्य आधार आणि विश्वास दिला तर ते अधिक आत्मविश्वासाने यश मिळवू




शकतात या प्रहसनात अथर्व जवणे कृष्णा दिगे प्रथमेश जवने संकेत वामन धनश्री गर्जे कांचन गाडे आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता छत्रपती संभाजीनगर विधानसभा निवडणुकात गाजलेल्या लाडकी बहिणी योजना आणि एक हे तो सेफ है याचा प्रभाव विद्यापीठाच्या केंद्रीय युवा महोत्सवातही दिसला विद्यापीठाच्या वतीने आयोजित चार दिवसीय केंद्रीय युवा महोत्सवास बुधवारपासून सुरुवात झाली सकाळी नऊ वाजता विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्णाकृती पुतळ्यापासून शोभायात्रेला सुरुवात झाली याचे उद्घाटन मनपा आयुक्त जी श्रीकांत यांच्या हस्ते झाले मराठवाड्यातील महाविद्यालयांनी विविध कला सादर करून रसिक प्रेक्षकांचे मनोरंजन केले तसेच प्रबोधनही केले हा युवा महोत्सव २५ डिसेंबर ते २८ डिसेंबर पर्यंत सुरू आहे.

# राष्ट्रपतींसह मान्यवरांनी घेतले माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांचे अंत्यदर्शन

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, कॉंग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांच्यासह देशभरातील नेते आणि मान्यवरांनी माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे अंत्यदर्शन घेऊन आदरांजली वाहिली.**



गुरुवारी, रात्री ९ वाजून ५१ मिनिटांनी माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे दिल्लीतील 'एम्स' रुग्णालयात निधन झाले. त्यानंतर रात्री उशिरा त्यांना मोतीलाल नेहरु मार्गावरील घरी आणण्यात आले. शुक्रवारी, सकाळपासून नेते आणि मान्यवरांनी त्यांच्या घरी येऊन अंत्यदर्शन घेऊन आदरांजली वाहिली आहे. सर्व मान्यवरांनी मनमोहन सिंग यांच्या पत्नी गुरशरण सिंग आणि कुटुंबियांचे सांत्वन करुन संवेदना व्यक्त केल्या. कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, अर्थमंत्री निर्मला सीतारामण, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, कॉंग्रेस सरचिटणीस प्रियंका गांधी, कॉंग्रेसचे संघटन सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल, समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव, आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल, दिल्लीच्या मुख्यमंत्री अतिशी, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन, तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी, हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सुखु यांच्यासह अनेक सर्व पक्षांतील विविध नेते आणि मान्यवरांनी माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांना आदरांजली वाहिली. दरम्यान, केंद्र सरकारने त्यांच्या स्मरणार्थ सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला आहे. भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे पार्थिव शनिवारी (२८ डिसेंबर) सकाळी ८ वाजता कॉंग्रेस मुख्यालयात आणले जाईल. सकाळी ८.३० वाजतापासून कॉंग्रेस मुख्यालयात कार्यकर्ते आणि नागरिकांना अंत्यदर्शन घेता येणार आहे. त्यानंतर ९.३० वाजता. कॉंग्रेस मुख्यालयातून डॉ. मनमोहन सिंग यांची अंत्ययात्रा सुरु होईल. राजघाटाजवळील सरकारी स्मशानभूमीत डॉ. मनमोहन सिंग यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. कॉंग्रेसचे संघटन सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी ही माहिती दिली.

पान १ वरून...

### सौर कृषी पंप बसवण्यात

या योजनेची घोषणा केली होती. राज्यात साडेदहा लाख सौर कृषी पंप बसविण्याचे उद्दीष्ट ठेवले आहे. त्यामुळे कृषी पंपासाठी पैसे भरून वीज कनेक्शनची प्रतीक्षा करणाऱ्या सर्व शेतकऱ्यांचा पेड पेंडिंगचा प्रश्न सुटणार आहे. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेसाठी महावितरणने स्वतंत्र पोर्टलची निर्मिती केली आहे. शेतकऱ्यांनी पंपासाठी ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर महावितरणकडून अर्ज मंजूर केला जातो. त्यानंतर शेतकऱ्याने त्याचा हिस्सा भरायचा असतो. शेतकऱ्याकडून पंप बसविण्यासाठी एजन्सीची निवड केली जाते. पंप बसविण्याच्या ठिकाणाची महावितरण, एजन्सी व शेतकरी अशी तिघांकडून संयुक्त पाहणी केली जाते, त्यानंतर कार्यादेश दिला जातो आणि शेतात पंप बसविला जातो. पंप बसविणाऱ्या एजन्सीवर पुढच्या काळात देखभाल दुरुस्तीचीही जबाबदारी आहे. सौर पॅनेल्समधून २५ वर्षे वीजनिर्मिती होत असल्याने तेवढा काळ शेतकऱ्यांना कृषी पंपाचे वीजबिल येत नाही. हे पंप पारंपरिक वीज पुरवठ्यावर अवलंबून नसल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या मर्जीप्रमाणे दिवसा कधीही सिंचन करता येते. त्यामुळे दिवसा वीज पुरवठ्याची शेतकऱ्यांची मागणी पूर्ण होते.

\-------------

### संतोष देशमुख यांच्या न्यायासाठी

राज्यभरात त्याचे तिव्र पडसाद उमटल्यावर शासन आणि प्रशासन जागे झाले. तीन आरोपी अटक केले असून १८ दिवस झाले तरी अद्याप तीन आरोपी व खंडणी प्रकरणातील वाल्मिक कराड यांना अटक करण्यात आले नाही. त्यामुळे त्यांना तातडीने अटक करण्याची मागणी होऊ लागली असून संतोष देशमुख यांना न्याय मिळावा यासाठी दि. २८ डिसेंबर रोजी बीडमध्ये सर्वपक्षीय मुकमोर्चा काढण्यात येत आहे. अन्यायाविरुध्द बीडकर रस्त्यावर उतरणार असून यावेळी कोण काय बोलतय याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. हा मोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर येथून निघणार असून साठे चौक-छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे. या मोर्चात शरद पवार, जितेंद्र आव्हाड, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया, खा. बजरंग सोनवणे, आ. सुरेश धस, आ. प्रकाश सोळंके, आ. विजयसिंह पंडीत, आ. संदिप क्षीरसागर यांच्यासह राज्यभरातून नेते व नागरीक सहभागी होणार आहेत. मोर्चाच्या पार्श्वभुमिवर चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला असून एसआरपीएफ, एसआरपी तुकड्यांसह ४५ अधिकारी आणि अंमलदार तैनात असणार आहेत. तसेच मोर्चाच्या मार्गावर गोपीनीय कर्मचारी, ड्रोन, सीसीटिव्हीच्या माध्यमातून निगराणी राहणार आहे.

\--------------

### एकाच व्यक्तीच्या नावावर

अधिकारी बाहेर काढले गेले. निष्क्रिय आणि आम्ही सांगू तेच करतील, अशा अधिकाऱ्यांना ठेवण्यात आले. या अधिकाऱ्यांनी या घटनेतील आरोपींना जामीन करुन देणे, त्यांना सहकार्य करणे, असे प्रकार घडले. त्याची लिंक मलेशियापर्यंत जाते, असा आरोप सुरेश धस यांनी केला.

\----------

### धनंजय मुंडेंना टार्गेट करण्याची सुरेश

एकत्र आल्यापासून धसांच्या पोटात दुखत असावे, त्यातच आमदार झाल्यावर आपण मंत्री होवू असे वाटत असताना पंकजा मुंडे यांना संधी दिली गेली. त्यामुळे धसांच्या पोटात पोटसुळ उठला आहे, असे सांगून ते म्हणाले, धनंजय मुंडे यांना जाणिवपुर्वक टार्गेट केले जात आहे. त्यांना टार्गेट करण्याची सुपारी धस यांनी घेतली का? आणि त्यांना ती सुपारी कोणी दिली? याची माहिती जनतेला व्हायला हवी, असेही मिटकरी म्हणाले. मिटकरी यांच्या वक्तव्यामुळे धनंजय मुंडे यांना टार्गेट करण्यात येत असल्याचे दिसते.

\---------------

### रासायनिक खतांच्या

खत उत्पादक कंपन्यांनी १ जानेवारी २०२५ पासून दरवाढ जाहीर केली आहे. त्यानुसार रासायनिक खतांच्या किमतीमध्ये २०० ते ३०० रुपयांची वाढ होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना अतिरिक्त भार सहन करावा लागणार आहे. शेतीमालाला भाव नसल्यामुळे शेतकरी अधीच मेटाकुटीला आला आहे. रासायनिक खतांचे दर अगोदरच जास्त आहेत. त्यात पुन्हा किमती वाढवून शेतकऱ्यांना अधिकचा भुर्दंड बसणार आहे. रासायनिक खतांचे वाढते दर पाहता भविष्यात शेतकऱ्यांना सेंद्रिय खताचा वापर वाढवावा लागणार आहे. शेतीला जोडधंदा म्हणून अनेक शेतकरी दूध व्यवसाय करतात; मात्र दुधालाही दर नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी हा धंदा बंद केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांपुढील अडचणी दिवसेंदिवस वाढू लागल्या आहेत.

\--------

### मराठी पत्रकार परिषदेच्या राज्य

सुभाष चौरे राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे, बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, संपादक राजेंद्र होळकर, हल्लाविरोधी कृती समितीचे बीड जिल्हा समन्वयक अभिमन्यू घरत, तालुका समन्वयक लक्ष्मण नरनाळे, तालुका निमंत्रक मंगेश निटूरकर, तालुका अध्यक्ष दत्ता आजबे, पत्रकार अशोक खाडे, अनिल जाधव आदींनी अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

\-----------

### मुख्यमंत्र्यांनी लोकार्पण केलेली

सिरसाळा परिसरातील ३२ गावे कृषी उत्पन्न बाजार समिती परळी वैजनाथ यास जोडणे संबंधीची दिनांक २८ जुलै १९९८ ची अधिसूचना प्रसिद्ध करून ही गावे परळी बाजार समितीत जोडण्यात आली. कृषी उत्पन्न बाजार समिती माजलगाव च्या मालकीचे मालमत्ता हस्तांतरित करायच्या दृष्टीने परळी बाजार समितीस सर्वे नंबर ३४३ मधील माजलगाव बाजार समितीच्या मालकीची २० एकर म्हणजे सुमारे आठ हेक्टर जमीन हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली, त्यानुसार जिल्हाधिकारी बीड यांनी क्रमांक २००७/मशाला-२/जमा-१/२९ दिनांक ०५/०५/२००७ अन्वये कृषी उत्पन्न बाजार समिती माजलगाव यांच्या ताब्यात असलेली उपबाजार पेठ सिरसाळा येथील सर्वे नंबर ३४३ मधील आठ हेक्टर जमीन कृषी उत्पन्न बाजार समिती परळी वैजनाथ ला आदेश क्रमांक ७६/आरबी-२/ एलएनडी/३०१/१-२८/८० दिनांक/०९/१९८५ मधील सर्व अटीस अधीन राहून हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात आली होती. ही सर्व कागदपत्रे अमच्यासह शासन दरबारी उपलब्ध आहेत. त्यानुसार या मंजूर आदेशाप्रमाणे माननीय जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांनी सदरील उपबाजार पेठ करिता या मालमत्तेचे मूल्यांकन रुपये १२३१६२२/- एवढी रक्कम बाजार समिती माजलगाव ला अदा करण्यात यावी त्यानुसार महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री नियमन अधिनियम १९६३ चे कलम ४४ अन्वये परळी बाजार समिती ही जमीन हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात आली होती. या मिळालेल्या मान्यता नुसार परळी बाजार समितीने नमूद केलेली सर्व रक्कम बाजार समिती माजलगाव यांना अदा करून ही मालमत्ता रीतसर हस्तांतरित करून घेतली आहे व तसेच जमिनीचे ७/१२ व ८अ मध्ये बाजार समितीचे मालकी म्हणून ८ हेक्टर जमिनीवर नाव लावण्यात आलेले आहे ते आज रोजी ही कायम आहे, ही जमीन कृषी उत्पन्न बाजार समितीकडून दिनांक २१/०७/२००३ रोजी च्या मोजणी नकाशा नुसार परळी बाजार समितीने ताब्यात घेतलेली आहे व या जमिनी चे सुधारित बाजार आवाराचे महाराष्ट्र शासनाचे राजपत्र दिनांक १६ जुलै २०१५ अन्वये प्रसिद्ध करण्यात येऊन ज्या मध्ये बाजार आवाराची चतु:सीमा नमूद आहे. या ताब्यात घेतलेल्या २० एकर जमिनी पैकी पाच एकर जमीन ही माजलगाव बाजार समितीकडूनच रामेश्वर सहकारी जिनिंग करिता भाडेतत्त्वावर देण्यात आलेली होती, परंतु सदरील जिनिंग ही बऱ्याच वर्षापासून बंद असल्या कारणाने व आवसायानात निघालेली असल्यामुळे त्या ठिकाणी बाजार समितीला विकास कामे करावयाच्या असल्यामुळे सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून या पाच एकर जमिनीचा ताबा बाजार समितीने घेतलेला होता. या पाच एकर जमिनीवर बाजार समितीचे संचालक मंडळ सभा दिनांक ०९/०७/२०१८ ठराव क्रमांक ६(६) अन्वये भव्य व्यापारी संकुल बांधण्याचा ठराव घेण्यात आला. त्याप्रमाणे पणन संचालक पणन संचालनालय पुणे यांच्याकडून दिनांक ०७/०१/२०२१ नुसार या पाच एकर जागे करीता च्या विकास आराखड्यास मंजुरी घेण्यात आली व दिनांक २०/१०/२०२० नुसार या जमिनीच्या आराखड्यास नगर रचनाकार बीड यांच्याकडूनही मंजुरी घेण्यात आली होती या मंजुरी घेतल्यानंतर बाजार समितीकडून ९३ गाळ्यांचे कै. पंडितअण्णा मुंडे व्यापारी संकुलाचे बांधकामास परवानगी मिळावी यासाठी माननीय पणन संचालक पणन संचालनालय पुणे यांच्याकडून जाक्र २४९७/ दिनांक २६/०७/२०२१ नुसार कलम १२ (१) ची मंजुरी घेण्यात येऊन कै. पंडितअण्णा मुंडे व्यापारी संकुलाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले संचालक मंडळाच्या सभा दिनांक ३०/११/२०२३ ठराव क्रमांक (४) अन्वये या व्यापारी संकुलनाचे उद्घाटन करण्याबाबत विषय सभेच घेण्यात आला हे उद्घाटन तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तत्कालीन उपमुख्यमंत्री तथागृहमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार व तत्कालीन कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते दिनांक ०५/१२/२०२३ रोजी उद्घाटन करण्याचे ठरले होते, त्यानुसार शासन आपल्या दारी या कार्यक्रमानिमित्त मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री व कृषी मंत्री हे या कार्यक्रमासाठी परळी येथे आले असता सदर संकुलाचे उद्घाटनाच्या लोकार्पण सोहळ्याकरिताच्या निमंत्रण पत्रिका सर्व वर्तमानपत्रात छापून आलेल्या आहेत तसेच या इमारतीचे म्हणजे कै. पंडितअण्णा मुंडे व्यापारी संकुलाचे उद्घाटन झाल्यानंतर अनामत भरलेल्या अधिकृत नोंदणी केलेल्या गाळेधारकांना भाडेपट्टा बाजार समितीकडून करून देण्यात आलेला आहे. या सर्व गोष्टींची कागदोपत्री नोंद शासन दरबारी आहे. यामुळे आमदार सुरेश धस यांच्याकडून हे व्यापारी संकुल बाजार समितीच्या जागेवर बांधण्यात आलेले नाही हे म्हणणे खोटे आहे. तसेच या व्यापारी संकुलाचे उद्घाटन झाले नाही हेही म्हणणे चुकीचे व खोटे आहे. आमदार सुरेश धस यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बाबतीत करण्यात आलेले सर्व आरोप खोटे व बिनबुडाचे असून हे आरोप अन्न व नागरी पुरवठा मंत्री माननीय नामदार धनंजय मुंडे साहेब तसेच सर्व संचालक मंडळ व बाजार समितीची बदनामी करण्यासाठीच केलेले आहेत असे यावरून दिसते असे सभापती सूर्यभान नाना मुंडे यांनी यावेळी सांगितले. मुख्यमंत्री किंवा उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते एखाद्या प्रकल्पाचे जेव्हा उद्घाटन/ भूमिपूजन होत असते तेव्हा त्याबद्दलची संपूर्ण माहिती तपासली जाते. त्यानंतरच मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री कार्यालय त्या उद्घाटन भूमिपूजनाला परवानगी देतात कोणत्याही वादग्रस्त ठिकाणी उद्घाटन भूमिपूजन या प्रमुख मंडळींच्या हस्ते होत नाही याचेही भान या आमदाराला नसावे याचा खेद व्यक्त केला आहे.स्वर्गीय पंडितअण्णा मुंडे यांनी सुरेश धस यांना १९९८ मध्ये जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष केले, स्वतः अध्यक्ष असताना सर्व अधिकार उपाध्यक्षांना दिले. १९९९ च्या विधानसभा निवडणुकीत आष्टीची जागा शिवसेनेकडून भांडून घेऊन भाजपासाठी सोडली आणि त्या ठिकाणी सुरेश धस यांना उमेदवारी देऊन निवडून आणले. पंडितअण्णा हे सुरेश धस यांच्यावर मुलासारखे प्रेम करायचे, त्याच अण्णांच्या नावाने वाढलेल्या मार्केट कमिटीच्या व्यापारी संकुलावर राजकीय द्वेष पोटी आरोप करताना भान आणि लाज बाळगावी असा सल्लाही सूर्यभान मुंडे यांनी धस यांना दिला आहे.

\--------------

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार, दि.२८ डिसेंबर २०२४


## ज्युनिअर आय. ए. एस कॉम्पिटिशन स्पर्धेत ज्ञानदीप विद्यालयाच्या इशिता शिनगारे व शर्या डाके यांना राज्यस्तरीय पारितोषिक

किल्लेधारुर । प्रतिनिधी

ज्युनिअर आय. ए. एस. कॉम्पिटिशन राज्यस्तरीय पारितोषिक वितरण सोहळा लातूर या ठिकाणी आयोजित करण्यात आला. यात ज्ञानदीप विद्यालय धारुर येथील शर्या गणेश डाके व इशिता सुधीर शिनगारे यांचा लातुरमध्ये पारितोषिक वितरण सोहळ्यात गौरव करण्यात आला.

महाराष्ट्रात ज्युनिअर आय. ए. एस. कॉम्पिटिशन स्पर्धा घेतल्या जातात.इयत्ता दुसरी ते सातवी वर्गातील विद्यार्थ्यांचा राज्यस्तरावर गुणवत्ता यादीत आलेल्या पहिल्या पाच विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा लातुर येथे आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यासाठी ज्ञानदीप विद्यालयातील इयत्ता तिसरी वर्गातून शर्या गणेश डाके व इशिता सुधीर शिनगारे या दोन विद्यार्थिनींची राज्यस्तरावर गुणवत्ता यादीत पाचवा क्रमांक मिळवला. त्याबद्दल त्यांचा ट्रॉफी, प्रमाणपत्र व धनादेश देऊन मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला. या यशाबद्दल ज्ञानदीप च्या संस्थेचे सर्व पदाधिकारी, पालक वर्ग व शिक्षक वृंद यांच्याकडून विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

# वैद्यनाथ - ओंकार साखर कारखाना देणार उसाला २७५० भाव - चेअरमन बाबूराव बोत्रे पाटील

## गळीत हंगामाचा झाला शुभारंभ, ५ लाख टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

**या भागातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन भाजपाच्या राष्ट्रीय सचिव तथा राज्याच्या पर्यावरण हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकारातून वैद्यनाथ साखर कारखाना वैद्यनाथ – ओंकार या नावाने सुरू करण्यात आला आहे. वैद्यनाथ ओंकार कारखान्यासाठी गाळपास येणाऱ्या उसाला यावर्षी २७५० रुपये भाव देणार असल्याची घोषणा ओंकार साखर कारखाना लि. (युनिट १ ते ९) ग्रुपचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांनी केली. वैद्यनाथ कारखाना पुन्हा सुरू होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.**



वैद्यनाथ- ओंकार साखर कारखान्याच्या सन २०२४-२५ या गळीत हंगामाचा शुभारंभ गुरुवार दिनांक २६ डिसेंबर रोजी ओंकार साखर कारखाना लि. (युनिट १ ते ९) ग्रुपचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील, परिसरातील कुमारीका आणि मान्यवरांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाला. यावेळी बोलताना बाबुराव बोत्रे पाटील म्हणाले की, वैद्यनाथ कारखाना हा लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्यासाठी जीव की प्राण होता आणि त्यांच्याच पावलावर पाऊल टाकत पंकजाताई मुंडे यांनी कारखाना चालवला. आगामी काळात हा कारखाना आणखी नावारूपास आणण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कारखाना आगामी काळात नावलौकिक प्राप्त करील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावर्षीच्या हंगामामध्ये पाच लाख टन उसाचे गाळप करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून ऊसाला २७५० रुपये भाव देणार असल्याचे जाहीर केले. गाळपाचे उद्दिष्ट पूर्ण झाल्यानंतर वाढीव हप्ता देण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी केली. परिसरातील शेतकऱ्यांनी आपला ऊस इतरत्र न देता वैद्यनाथ - ओंकार साखर कारखान्यालाच द्यावा असे आवाहनही त्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना केले.

वैद्यनाथ - ओंकार कारखाना चालवण्यासाठी कर्मचारी शेतकरी आणि परिसरातील सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहनही बाबुराव बोत्रे पाटील यांनी केले.

यावेळी ओंकार साखर कारखाना लि. (युनिट १ ते ९) ग्रुपच्या संचालिका सौ. रेखाताई बोत्रे पाटील, संचालक ओमराजे बोत्रे पाटील, वैद्यनाथ साखर कारखान्याचे उपाध्यक्ष चंद्रकांत कराड, संचालक ज्ञानोबा माऊली मुंडे (अध्यक्ष पोलिस पाटील संघटना), राजेश गिते, अॅड. हरिभाऊ गुट्टे, संजय आघाव, रेशीमनाना कावळे, वसंत राठोड, सुरेश माने, वैद्यनाथ- ओंकार साखरचे जनरल मॅनेजर गिरीश लोखंडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वैद्यनाथ साखर कारखान्याचे संचालक राजेश गीते यांनी केले. प्रारंभी ओंकार साखर कारखाना लि. (युनिट १ ते ९) ग्रुपचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील व सौ. रेखाताई बोत्रे पाटील यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते बॉयलर अग्नी प्रदीपन करण्यात आले. तसेच सत्यनारायण पुजा करून बैलगाडी पूजन करण्यात आले. गव्हाणीजवळ प्रभू वैद्यनाथ, लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर ऊसाच्या मोळीचे पूजन व गव्हाणीत मोळी अर्पण करून गळीत हंगामाचा शुभारंभ करण्यात आला.

## संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्या- दत्ता काकडे

**सातारा । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील मसाजोग येथील सरपंच स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्या आणि या मागचा मास्टर माईंड शोधा या मागणीसाठी सातारा जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत बंद ठेवून सरपंचांनी सरपंच परिषदेचे अध्यक्ष दत्ता काकडे यांच्या नेतृत्वाखाली मुंबई- बेंगलोर हायवेवर रास्ता रोको केला. यावेळी सर्व सरपंचांनी न्याय नाही मिळाला तर आणखी उग्र आंदोलन करण्याचा इशारा दिला या रास्ता रोकोमध्ये जिल्ह्यातील सरपंच मोठ्या संख्येने उपस्थित होते.**




यावेळी बोलतांना दत्ता काकडे म्हणाले की ज्या ग्रामपंचायतला १९ पुरस्कार मिळाले आणि जो सरपंच आजही पत्र्याच्या घरात राहतो .अशा लोकांसाठी काम करणाऱ्या सरपंचाची अशाप्रकारे निर्घृण हत्या व्हावी ही राज्यासाठी निंदनीय बाब आहे. या राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरपंचासाठी अनेक चांगल्या योजना आणल्या आज ते गृहमंत्री आहेत. या प्रकरणाचा छडा लावून या प्रकरणातील सर्व आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी आणि हत्या प्रकरणातील मास्टरमाइंड शोधून काढून त्यावर कठोर कारवाई करावी या मागणीसाठी राज्यभर सरपंच परिषदेच्या वतीने आंदोलन चालू आहे. आज बीड जिल्ह्यामध्ये याप्रकरणी मोठा मोर्चा आहे. या मोर्चातही सरपंचांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन यावेळी सरपंच परिषदेचे अध्यक्ष दत्ता काकडे यांनी केले .या रास्ता रोकोला मोठ्या संख्येने सरपंच, महिला सरपंच उपस्थित होते.

## कै. सटवाजी अण्णा मेंडके यांचा प्रथम पुण्यस्मरण दिन संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

कै.सटवाजी अण्णा मेंडके यांच्या प्रथम पुण्य स्मरण दिना निमित्ताने, ह.भ.प महादेव महाराज टालेवाडी कर यांचे कीर्तन कालिका देवी मंदिर येथे आयोजित करण्यात आले होते .




यावेळी महादेव महाराज यांनी कै सटवाजी अण्णा मेंडके यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त त्यांच्या आठवणीला उजाळा देत राम कथा ही गुणीजन बनवते असे विवेचन केले. त्यांना सुद्धा पाच मुले व चार मुली आहेत पाच मुलांनी समाजामध्ये चांगल्या प्रकारचे काम उभे केले.राम कथेमध्ये जसा चार भावांचा गजबजलेला परिवार होता तसाच परिवार कै.सटवाजी अण्णा मेंडके यांचा आहे. पुढे बोलताना महादेव महाराज टालेवाडीकर यांनी जन्म आणि मृत्यू हा अटळ असून मृत्यूनंतरही ज्यांचं नाव अजरामर राहतं अशी माणसं कर्तुत्ववान असतात, गुणवान असतात अशा प्रकारचे विवेचन केले.कै. सटवाजी अण्णा मेंडके यांचे चिरंजीव ज्ञानेश्वर मेंडके यांनी आपल्या आयुष्यातील जास्तीत जास्त वेळ हा समाजकार्यासाठी दिला याबद्दल त्यांचेही कौतुक करण्यात आले. कारण समाजासाठी झटणारी माणसं ही थोर असतात आणि त्या पद्धतीने नानांनी सुद्धा समाजासाठी खूप काम केले हे थोरात मोठ्या च्या पुण्याईने होते. असं त्यांनी कीर्तनाच्या निमित्ताने सांगितलं .यावेळी पंचक्रोशी मधील राजकीय सामाजिक पुरुष महिला बंधू मित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमा नंतर सर्वांनी भोजनाचा प्रसाद घेऊन प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्ताने अनेकांनी अनेक प्रकारच्या आठवणी काढल्या व प्रथम पुण्यस्मरण दिनी कै.सटवाजी अण्णा मेंडके यांचा कालिका देवी मंदिरामध्ये टालेवाडी कर महाराज यांचे कीर्तन संपन्न झाले.

## न्यू व्हिजन पब्लिक स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन, व्हिस्टा- २०२४ उत्साहात संपन्न

अंबाजोगाई । प्रतिनिधी

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ हे सदैव नवनवीन प्रयोग करून आपल्या विद्यार्थ्यांच्या कलाकृती चा आविष्कार सादर करत असते.श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या न्यू व्हिजन पब्लिक स्कूल मध्ये चित्रपटाच्या धर्तीवर नात्यांचा ओलावा सादर करत विद्यार्थ्यांचे स्नेह सम्मेलन, व्हिस्टा-२०२४ मोठ्या उत्साहात साजरे झाले. यावेळी एलकेजी ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी तसेच धार्मिक विविध गाण्यांवर नृत्य सादर करत आपला आविष्कार सादर केला.या वार्षिक स्नेह संमेलनात व्यासपीठावरून संस्थेचे संस्थापक राजकिशोर मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी , प्रमुख अतिथी मुख्याधिकारी नगर परिषद अंबाजोगाईच्या श्रीमती प्रियंका टोंगे, मार्गदर्शक डी.एच.थोरात , मार्गदशक वसंत चव्हाण, उद्योजक धनराज सोळंकी , प्रा.



विवेकानंद राजमाने , अॅड . संतोष पवार , डॉ. विश्वजित पवार , डॉ . संदीप थोरात, प्राचार्य बगले सर, प्राचार्य रेंजू आर चंद्रण ,श्रीमती सुनिता राजकिशोर मोदी ,श्रीमती डिंपल संकेत मोदी ,डॉ. अर्चना थोरात, डॉ . मनिषा पवार, प्रा . सविता बनाळे, श्रीमती मिसाळ मॅडम यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षीस वितरीत करण्यात आले. या स्नेह सम्मेलनात प्री प्रायमरीच्या विद्यार्थ्यां पासून ते इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांपर्यंत नाटकीय सूत्र संचलनासह विविध नृत्य सादर करण्यात आले. यावर्षी नाटक व नृत्य यांच्या सुंदर मिलापाने नाते जपण्याचा संदेश देत व्हिस्टा, रिशते -२०२४ ही सामाजिक संदेशपर थीम घेऊन हे वार्षिक सम्मेलन साजरे करण्यात आले. याप्रसंगी श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी संचालक संकेत मोदी यांनी आपल्या संस्थेबद्दल माहिती दिली. श्री बालाजी शिक्षण संस्था ही नेहमीच विद्यार्थ्यांचे हित जोपासण्याचे काम करत आहे. वेळोवेळी विद्यार्थ्यांना शैक्षणिक उपक्रमासोबतच सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात येऊन त्यांना प्रेरित करण्यात येते. प्रत्येक शाळा ही विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन आयोजित करतच असते मात्र विद्यार्थ्यांकडूनच काहीतरी नवीन करून घेऊन एक सांस्कृतिक व सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने करण्यात आला असून त्यामध्ये संस्थेच्या सर्व शिक्षक, प्राध्यापक तसेच प्रामुख्याने विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग असल्याचे अभिमानाने संकेत मोदी यांनी याप्रसंगी सांगितले. संस्थेचे प्राचार्य रेंजू आर चंद्रन यांनी देखील आपल्या संस्थेचा व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक निकाल व इतिवृत्त सांगितला. या सम्मेलनाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या सर्व शिक्षकांनी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी , विद्यार्थ्यांनी , कोरीओग्राफर यांनी खूप मेहनत घेतली याबद्दल संस्थापक राजकिशोर मोदी, संकेत मोदी यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी त्यांचे कौतुक करत शुभेच्छा व्यक्त केल्या .विद्यार्थ्यांच्या या वार्षिक स्नेहसंमेलन व्हिस्टा - २०२४ साठी मोठया प्रमाणावर विद्यार्थी त्यांचे पालक व अन्य प्रेक्षक उपस्थित होते.

पान ६ वरून...

### स्व.संतोष देशमुख यांच्या परिवारासाठी

या घटनेचा निषेध करत आम्ही देशमुख कुटुंबीयांसोबत असल्याचा संदेश देण्याचा प्रयत्न केला.

केज तालुक्यातील मसाजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी अपहरण करून हत्या करण्यात आली होती. या भयान प्रकाराचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रात उमटत आहेत असे असताना मात्र अद्याप काही आरोपी पोलिसांच्या हाती लागलेली नसून मोकाट फिरत आहेत संतोष देशमुख हे एक आदर्श सरपंच होते त्यांनी मसाजोग गावासाठी अनेक उपक्रम राबवून मसाजोग हे गाव आदर्श गाव बनविण्याचे काम त्यांच्या हातून घडले होते निस्वार्थ भावनेतून काम करणारा एक आदर्श तरुण सरपंच म्हणून त्यांनी आपले नाव लौकिक केले होते सरपंच म्हणून समाजाचे काम करत असताना कसलाही स्वार्थ त्यांनी त्यांच्या कार्यकाळात पाहिला नाही त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती जेमतेमच त्यात त्यांची काही समाज कंटाळाकडून निर्गुण हत्या झाल्याने देशमुख कुटुंबीय मोठ्या अडचणीत सापडले आहे अशात गेलेला माणूस परत आणून देणे शक्य नसल्याने समाज हत्या करणाऱ्या आरोपींना कठोरातील कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी करत असताना संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांना एक हात मदतीचा म्हणून आर्थिक मदत करण्याचा प्रयत्न करत आहे त्याच अनुषंगाने धारूर शहरात धारूर वासियांनी मदत फेरी काढली होती या मदत फेरीत सर्व समाजातील नागरिकांनी पुढे येत सढळ मनाने मदत केली यावेळी ३ लाख १३ हजार रुपयाची मदत गोळा करण्यात आली असून ही जमा झालेली मदत देशमुख कुटुंबीयांना दि. ४ जानेवारी रोजी सुपूर्द करण्यात येणार आहे त्यामुळे अजून कोणाला देशमुख कुटुंबियांना मदत करायची असेल तर मदत करण्याचे आवाहन समाज बांधवांच्या वतीने करण्यात आले आहे.

पान ६ वरून...

### संघर्षशील व्यक्तिमत्व असणारे

शुभेच्छा दिल्या, संघर्षातून आलेल व्यक्तिमत्व म्हणून आज बीड जिल्ह्यात वकिली व्यवसायात नावारुपालाआले गोरगरिबांचे कैवारी वकील म्हणून त्याचे नाव आहे .अशा ॲड.अविनाश गंडले, साहेबांचा या ठिकाणी वाढदिवस संपन्न झाला वाढदिवसानिमित्त अनेकांनी त्यांना पुष्पगुच्छ, पुष्पहार देऊन त्यांचा सत्कार केला आणि आपल्या भावना व्यक्त केल्या यावेळी त्यांना उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभो अशा शुभेच्छा सर्वांनी दिल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचान ऍड.वाघमारे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी, अँड. .शुभम सरवदे,ऍड . इम्रान पटेल, ऍड.बप्पा माने,ऍड .किरण मस्के , ऍड.राजेश शिंदे, ऍड. सचिन गिरी. आदींनी प्रयत्न केले.

### किसनराव खेडकर (नाना )

दुपारपासून अगदी गावकऱ्यांची नातलगांची मोठी वेग लागली आहे. उद्या सकाळी म्हणजे शनिवार दि. २८ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता नातलग, ईस्ट परिवार, गावकरी यांच्या उपस्थितीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी भीमाबाई किसनराव खेडकर, दिलीप किसनराव खेडकर, अर्जुन किसनराव खेडकर, रवींद्र किसनराव खेडकर ही मुले व सौ.सरस्पती सुरेश सांगळे,सौ. सुरेखा अशोक ढाकणे,सौ. वैशाली रामकिसन सांगळे,या मुलीसह सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### वात्रटिकाकार मसने यांना

करतात. असे एक बहूअंगी व्यक्तिमत्व श्री.बी.आर. मसने यांच्या विविध पैलूची दखल घेऊन मैत्रा फाउंडेशन बीड,च्या वतीने राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार बुधवारी घोषित करण्यात आला. तसे त्यांना घोषणेचे पत्र प्राप्त झाले आहे.पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचे शाळेच्या वतीने व विविध स्तरांवर अभिनंदन करण्यात येत आहे.

### जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यास

पालकांना व विद्यार्थ्यांनी बीड येथील कार्यालयात जाऊन चौकशीही केली. निवडणूक विधानसभेची असल्याने कर्मचारी कार्यालयात नाहीत असे सांगून प्रमाणपत्र देण्यास उशीर होत आहे, असे सांगितले जात होते. विधानसभेची निवडणूक संपल्यानंतर सर्व कर्मचारी कार्यालयात हजर असताना जात वैधता प्रमाणपत्राचे काम कासव वतीने सुरू असल्याचे दिसून येत आहे. बारावीच्या परीक्षा जवळ आल्या तरी अजूनही जात वैधता प्रमाणपत्र मिळाले नसल्याने पालकांसह विद्यार्थी तणावात आहेत. जात पडताळणी समितीने या गंभीर बाबीची दखल घेऊन तत्काळ कार्यवाही करावी आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक होणारे नुकसान रोखावे व विद्यार्थ्यांनी दाखल केलेले प्रमाणपत्र त्वरित वितरित करावे अशी मागणी पालकांकडून होत आहे.

विद्यार्थी-पालक चिंताग्रस्त

चार-चार महिने अर्ज दाखल करून सुद्धा त्यावर कोणताही विचार होत नसल्याने विद्यार्थ्यांना संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. वेळेवर प्रमाणपत्र मिळेल की नाही याबाबतही शंका उपस्थित होत आहेत. जर जात पडताळणी वेळेवर झाली नाही तर गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाण्याची शक्यता आहे. यामुळे त्यांच्यावर अन्याय होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### मुकुंदराज यात्रेनिमित्ताने

विविध पुस्तकांचे व खेळण्यांची दुकानेही लागली होती. खेळण्याचे साहित्य यासह उपयोगी वस्तू खरेदी करण्यासाठी यात्रेकरूंनी गर्दी केली. यात्रेत लहान मुलांचे खेळणे रहाटपाळणे होते यात बसण्याचा आनंद शालेय विद्यार्थी,युवक,युवती यांच्यासह यात्रेकरूंनी घेतला. गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिस बंदोबस्तही चोख होता.

### गंगाई- बाबाजी राज्यस्तरीय

सोमवार दिनांक २० जानेवारी २०२५ पर्यंत आपले प्रस्ताव भगवान महाविद्यालय, आष्टी येथे सादर करावेत, असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आलेले आहे. या संदर्भातील अधिक माहितीसाठी आपण डॉ.दत्तात्रय वाघ (प्राचार्य-९४२३७१६८५२), डॉ. ज्ञानदेव वैद्य (उपप्राचार्य-९४२३७१६८५९) व डॉ. आप्पासाहेब टाळके (उपप्राचार्य-९४२१४४३५९०) व डॉ.आबासाहेब पोकळे (९७६३४३४५४६)यांच्याशी संपर्क साधावा असे महाविद्यालयाच्या वतीने कळविण्यात आलेले आहे.

### पत्रकार संग्राम धन्वे यांना

प्रतिबंध करण्यासाठी आणि प्रसारमाध्यमातील व्यक्ती किंवा प्रसारमाध्यम संस्था यांच्या मालमत्तेचे नुकसान किंवा हानी होण्यास प्रतिबंध करण्यासाठी अधिनियम १७ नुसार तसेच

१ भारतीय न्यायिक संहिता (), २०२३ ११५(२)
२ भारतीय न्यायिक संहिता (), २०२३ ३५२
३ भारतीय न्यायिक संहिता (), २०२३ ३५१(२)
४ भारतीय न्यायिक संहिता (), २०२३ ३५१(३)
५ भारतीय न्याय साहित्य (), २०२३ ३(५)

वरील कलमानुसार दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास पोलिस अधीक्षक बोल्डे यांच्याकडे आहे.

## आदित्य शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांचा पुन्हा अटकेपार झेंडा

**बीड । प्रतिनिधी**

**आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी च्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा आणि येथील तज्ज्ञ प्रचार्य, प्राध्यापक यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळत असल्याने विविध क्षेत्रात आदित्य शिक्षण संस्थेचे विद्यार्थी कार्यरत आहेत. नुकत्याच या संस्थेच्या तीन आजी-माजी विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा संस्थेचा अटकेपार झेंडा फडकवला असून या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.**

### राजस्थान राज्यात शासकीय मेडिकल ऑफिसर म्हणून बैरागी, पीजीमध्ये आकांक्षा महाराष्ट्रातून द्वितीय तर डॉ. संदीपान हजारे परीक्षेत प्रथम


डॉ.पूजाकुमारी बैरागी


डॉ.आकांक्षा काटकर


डॉ.संदीपान हजारे

आदित्य शिक्षण संस्थेमधील आदित्य दंत महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी बैरागी पूजाकुमारी सोहनदास २०१२-१३ या बॅच ची विद्यार्थीनी असून त्यांची राजस्थान राज्यात शासकीय मेडिकल (डेंटल )ऑफिसर म्हणून निवड झाली आहे. बैरागी पूजाकुमारी सोहनदास आदित्य शिक्षण संस्थेत शिक्षण घेत असतांना दाखवलेली मेहनत आणि समर्पण यासोबत येथील प्राध्यापकांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे आज बैरागी यांनी गगन भरारी घेतली आहे. संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा यांनी सदैव विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले आहे. त्यांच्या प्रेरणेतून विद्यार्थी घवघवीत यश संपादन करत आहेत. डॉ.आदित्य सारडा, डॉ.आदिती सारडा हे विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करत आहेत. डॉ. हिमांशू श्रीवास्तव, प्राध्यापक यांचेही विद्यार्थ्यांना नेहमीच सहकार्य मिळत आहे.तर आदित्य दंत महाविद्यालयाची ऑर्थोडोंटिक्स आणि डेंटोफेशियल ऑर्थोपेडिक्स प्रथम वर्षीय पदव्युत्तर विद्यार्थिनी काटकर आकांक्षा ईश्वर ही महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ नाशिक () पहिल्या वर्षाच्या हिवाळी पीजी परीक्षा मध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून द्वितीय क्रमांक मिळवला आहे. याच बरोबर डॉ. संदीपान आत्माराम हजारे २०२३ प्रवेश परीक्षेमध्ये १४८८ आणि इतर मागासवर्गीयांतून प्रथम श्रेणी प्राप्त केली आहे. त्यांचा प्रवेश शासकीय दंत महाविद्यालय नागपूर येथे शाखेत पदव्युत्तर शिक्षणासाठी झाला आहे. डॉ.संदीपान हजारे हे पूर्ववत - परीक्षेतून ६२ प्राप्त करून प्रतिष्ठित रुग्णालय येथे ज्युनिअर रेसिडेंट म्हणून एक वर्ष कार्यरत होते.

### आदित्य शिक्षण संस्थेतून विद्यार्थी घडतात याचा अभिमान

आदित्य शिक्षण संस्थेच्या विविध महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना केवळ आम्ही पुस्तकी ज्ञान देत नाहीत. येथे आलेल्या विद्यार्थ्यांना आयुष्यभर पुरेल अशी शिदोरी मिळते. शिक्षणाबरोबर स्पर्धा परिक्षा, क्रीडा, सांकृतिक ज्ञान घेऊन बाहेर पडलेला विद्यार्थी आयुष्यात यशस्वी होतोच. आमच्या संस्थेत विद्यार्थी घडतात याचा अभिमान असून नुकतेच तीन विद्यार्थ्यांनी मोठे यश मिळवले आहे. त्यांचे संस्थेच्या वतीने अभिनदंन करण्यात आले. त्यांच्याकडून इतर विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते.

-डॉ आदित्य सारडा, संचालक,
आदित्य शिक्षण संस्था

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२२/८५२
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक : २०/१२/२०२२

नाव बदलण्याचा
जाहिरनामा

अर्जदार श्री. सौ. श्रीमती :- पार्वतीबाई हिरालाल गायकवाड
रा.वलखेडा

प्रकरण : सर्वे नं.११ प्लॉट नंबर १० सि.स.नंबर ३१०२ चे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमता घर क्र. (प्लॉट नं.१०) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बद्दल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतु:सिमा
पूर्व -प्लॉट नं.११
पश्चिम :- प्लॉट नंबर ०९
दक्षिण - याच सर्वे नंबर मधील आदर्शनगर प्लॉटींग
उत्तर : ०९ मीटर रूंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता

मुख्याधिकारी
नगर परिषद, अंबड

# शेतकऱ्यांनी सांगितल्याशिवाय अनावश्यक पंचनामे करण्याची गरज काय?

## राज्याच्या कृषिमंत्र्यांचा अजब सवाल

अकोला : शेतकऱ्यांनी नुकसान झाल्याचं सांगितल्याशिवाय अनावश्यक पंचनामे करण्याची गरज काय?, असं काहीसा वादग्रस्त सवाल राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केलाय. ते अकोला येथे कृषी विद्यापीठाच्या तीन दिवसीय कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. दरम्यान, कृषी विद्यापीठातील स्टॉल धारकांना विद्यापीठाने शुल्क आकारण्याच्या प्रश्नावरही त्यांनी वादग्रस्त उत्तर दिलंय. लोकसहभागातूनच कोणतेही काम पूर्णत्वास जाते. सरकारने फुकट दिले तर मग काहीच काम करायचं नाही का?, असा सवाल त्यांनी केलाय. आज अकोल्याच्या कृषी विद्यापीठातील कृषी प्रदर्शन उद्घाटनाचा कार्यक्रम माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे रद्द करण्यात आलाय. यावेळी कृषीमंत्र्यांनी मनमोहनसिंग यांना श्रद्धांजली वाहिलीय.

कृषी विद्यापीठातील रिक्त जागांसंदर्भात लवकरच निर्णय- माणिकराव कोकाटे

आज झालेल्या अवकाळी पावसामुळे नुकसान झाले की नाही हे स्पष्ट होत नाहीय. त्यामुळे



पंचनामे संदर्भात सध्या कोणताही निर्णय घेणार नसल्याचे कृषिमंत्र्यांनी स्पष्ट केलेय. राज्यातील कृषिमंत्री पदाचा कारभार सांभाळल्यानंतर कृषिमंत्री माणिकराव कोकाटेंनी प्रथमच अकोल्यातील कृषी विद्यापीठाला भेट दिलीय. दरम्यान राज्यातील कृषी विभाग आणि कृषी विद्यापीठातील रिक्त जागांसंदर्भात लवकरच माहिती घेऊन निर्णय घेऊ, असं ही ते म्हणालेय. दरम्यान आपल्या नाशिकच्या पालकमंत्रीपदाबद्दल मुख्यमंत्रीच निर्णय घेतील असंही माणिकराव कोकाटे म्हणालेत. छगन भुजबळांच्या नाराजीबद्दल वरिष्ठ निर्णय घेतील, असे ही ते म्हणालेय.

माणग्यांसाठी वृद्ध महिलेने कृषीमंत्र्याचे पाय धरले : किसान ब्रिगेडची एक वृद्ध महिला राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या पाया पडली. शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी त्यांनी कृषीमंत्र्याचे पाय धरत आपल्या मागण्या त्यांच्या समोर मांडल्या. अकोल्यातल्या डॉक्टर पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या आयोजित कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटनासाठी कृषिमंत्री कोकाटे अकोल्यात आले होते.

त्याचवेळी हा प्रकार घडलाय. यादरम्यान पोलिसांनी महिलेला बाजूला केलंय, अशातच विदर्भातल्या शेतकऱ्याचं कर्ज माफ करा, शेतकऱ्यांसाठी आणि तरुणांसाठी विदर्भातील रोजगार द्या, १२ तास शेतकऱ्यांना विज द्या, अशा किसान ब्रिगेड महिलेच्या प्रामुख्याने मागण्या होत्या.

# वाढत्या थंडीत गव्हावरील तांबेरा रोगाचे वेळीच करा नियंत्रण

तापमानातील चढ-उतार, धुके, जास्त आर्द्रता आणि ढगाळ वातावरण यामुळे गहू पिकावर तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव वेगाने होण्याची शक्यता आहे. सध्याच्या वातावरणामुळे गव्हावर नारंगी तांबेरा आणि काळा तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात आढळून येतो. तांबेरा हा गव्हावरील अत्यंत हानिकारक रोग आहे. या रोगाकडे दुर्लक्ष केल्यास पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन उत्पादनात ८० ते १०० टक्क्यांपर्यंत घट येऊ शकते. गहू पीक दाणे भरण्याच्या अवस्थेत असताना या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास दाण्यांवर सुरकुत्या पडून त्याचे नुकसान होते. यासाठी तांबेरा रोगाची कारणे व त्यावरील नियंत्रण उपाय जाणून घेण्याची गरज आहे.



नारंगी किंवा पानांवरील तांबेरा : हा तांबेरा पक्सीनिया ट्रीटीसीना या हवेद्वारा येणाऱ्या बुरशीच्या बीजाणूंमुळे होतो. १५ ते २५ अंश सेल्सिअस तापमान व पानावर किमान ३ तास दव साठल्यास या तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव वाढतो. प्राथमिक अवस्थेत नारंगी तांबेरा प्रामुख्याने पानाच्या वरच्या भागावर दिसून येतो. रोगाची लागण झाल्यावर पानावर गोलाकार ते अंडाकृती आकाराचे लहान लहान ठिपके दिसून येतात. अनुकूल हवामानात ठिपक्यांच्या जागी असंख्य बीजाणू तयार होऊन ठिपक्यांचा रंग नारंगी ते गर्द नारंगी दिसू लागतो. रोग्रस्त पानावरून बोट फिरवल्यास नारंगी रंगाची पावडर बोटावर दिसून येते.

काळा किंवा खोडावरील तांबेरा : रोगकारक बुरशी पक्सीनिया ग्रामिनीस ट्रीटीकीचा प्रसार हवेद्वारे वाहून आलेल्या बीजाणूंमुळे होतो. पानावर किमान ६ ते ८ तास ओलावा किंवा दव साचलेले असल्यास व तापमान १४ ते १५ अंश सेल्सिअस तापमान या रोगाच्या प्रसारास अनुकूल असते. तापमान ३० अंश सेल्सिअसपर्यंत गेल्यास रोगाचा प्रादुर्भाव अत्यंत झपाट्याने वाढतो. या रोगाच्या वाढीसाठी नारंगी तांबेरा रोगापेक्षा साधारण ५.५ अंश सेल्सिअसने जास्त तापमानाची आवश्यकता असते. रोगाचा प्रादुर्भाव पानाच्या खालच्या व वरच्या बाजूवर होतो. अनुकूल हवामानात खोडावर, देठावर, ओंबीवर तसेच कुसळावर देखील रोगाचा प्रादुर्भाव आढळून येतो. रोगग्रस्त पानांवर अंडाकृती ते लंब-गोलाकार आकाराचे हरितद्रव्य नष्ट झालेले लहान ठिपके दिसून येतात. कालांतराने त्या ठिकाणी बुरशीच्या विटकरी रंगाच्या बीजाणूची पावडर दिसून येते. ज्यामध्ये बुरशीचे असंख्य बीजाणू असतात. पिकाच्या बाल्यावस्थेत रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास मोठ्या प्रमाणात नुकसान होते.

रोगाचे नियंत्रण उपाय : तांबेरा रोगास प्रतिकारक्षम वाणांची पेरणी करावी. तांबेरा रोगाला प्रतिकारक्षम जाती: फुले समाधान, नेत्रावती, त्र्यंबक, फुले अनुपम, एन.आय.ए.डब्ल्यू. ३४, एम.ए.सी.एस. ६२२२, एम.ए.सी.एस. ६४७८. शिफारशीप्रमाणे पाण्याच्या पाळ्यांचे नियोजन करावे. सतत पाणी दिल्यास ओलावा टिकून राहून रोगांचे प्रमाण वाढते. रासायनिक खतांच्या मात्रा शिफारशीप्रमाणे द्याव्यात. शिफारशीपेक्षा जास्त प्रमाणात युरिया खताचा वापर केल्यास रोगाचा प्रादुर्भाव वाढू शकतो.

रासायनिक नियंत्रण : मॅन्कोझेब (७५ टक्के डब्ल्यूपी) २.५ ग्रॅम किंवा प्रोपीकोनॅझोल (२५ टक्के ईसी) १० मिलि प्रति लिटर पाणी फवारणी करावी. आवश्यकतेनुसार १५ दिवसांच्या अंतराने दुसरी फवारणी करावी.

# स्मार्ट शेती करण्यासाठी हे सोलर उपकरणे वापरा; खर्च होईल कमी

शेतकरी आधुनिक शेती करण्यावर जास्त भर देतात. जेणेकरून शेतकऱ्यांना त्याचा फायदा होईल. मात्र शेतकऱ्यांना आधुनिक शेती करण्यासाठी अशी काही उपरकाने आवश्यक आहेत जे की त्यांचे काम अगदी सहजरित्या होऊ शकते.

सौर पंप : कोणत्याही जलपंपाचे काम हे पाणी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेणे हे असते. तसेच सोलर वॉटर पंपचे कामही अगदी तसेच आहे. कारण तो सोलर वॉटर पंप आहे. त्याला चालण्यासाठी सूर्यप्रकाश आवश्यक आहे. त्यामुळे शेतकरी त्याचा वापर सिंचन पंप, घरगुती पंप, बागायती शेतीसाठी करतात. सौर पाण्याचे प्रामुख्याने दोन प्रकार आहेत. पहिला सोलर सबमर्सिबल पंप. हा पंप आपल्या देशात सर्वात जास्त वापरला जातो. हा सबमर्सिबल पंप जमिनीच्या आत राहून वरच्या दिशेने पाणी पाठवतो. तसेच सोलर सबमर्सिबल पंप जास्त खोलीतून पाणी काढण्यासाठी वापरला जातो.

सोलर ड्रायर : शेतात फळबागा, भाजीपाला व मसाल्यांची लागवड शेतकरी करतात. मात्र शेतकऱ्यांना अनेक चांगल्या उत्पादन मिळून देखील बाजारात रास्त भाव मिळत नसल्याने अगदी मोठा तोटा सहन करावा लागतो. त्यामागचे सर्वात मोठे कारण म्हणजे उत्पादनांमधील ओलावा. शेतातील फळे, भाजीपाला व मसाल्यांमध्ये जास्त ओलावा असल्याने पिके मोठ्या प्रमाणात खराब होतात. यामध्ये प्रामुख्याने कांदा, टोमॅटो, हळद, आले, फळे, भाजीपाला व मसाला पिके खराब होतात. त्यामुळे शेतकरीवर्ग पिकांमधील ओलावा कमी करण्यासाठी पिके वाळवले जातात, जेणेकरून ते बरेच दिवस सुरक्षित देखील ठेवता येतात. त्यामुळे शेतकऱ्यांनी सोलर ड्रायर या तंत्राचा वापर कारने फायदेशीर ठरू शकते. जेणेकरून धान्य बाजारात पाठवण्यापूर्वी ते वाळवण्यासाठी त्याचा वापर केला जातो.

सोलर इन्सेक्ट ट्रॅप : सोलर इन्सेक्ट ट्रॅप म्हणजेच सौर कीटक सापळा बनवण्यासाठी सौर प्लेट आणि सौर चार्जेबल बॅटरी वापरली जाते, त्यानंतर कीटकांना आकर्षित करण्यासाठी अल्ट्रा व्हायोलेट एलईडी दिवा लागतो आणि त्यानंतर या तीन गोष्टी जोडून तयार केल्या जातात. इको फ्रेंडली सौर कीटक सापळा, जो कोणत्याही प्रकारच्या हानिकारक कीटकांना स्वतःकडे आकर्षित करून मारण्यास सक्षम आहे. हे सौर सापळे रात्र पडताच आपोआप चालू होतात आणि ५ ते ६ तास सतत चालतात.



## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६१२ : गॅलिलिओ गॅलिली याने प्रथमच नेपच्यून या ग्रहाचा शोध लावला. मात्र तेव्हा त्याला तो तारा आहे असे वाटले होते.
१८३६ : स्पेनने मेक्सिकोच्या स्वातंत्र्याला मान्यता दिली.
१८४६ : आयोवा हे अमेरिकेचे २९ वे राज्य बनले.
१८९५ : ऑगस्टा व लुई या ल्युमियर बंधूंनी पॅरिस येथे चित्रपटाचा जगातील पहिला खेळ सादर केला. या खेळाचे तिकीट होते एक फ्रँक.
१८८५ : मुंबई येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना
१९०८ : मेसिना, सिसिली येथे भूकंप. ७५००० लोकांचे निधन.
१९२६ : इंपिरियल एयरवेज ने भारत आणि इग्लंड यांच्या मध्ये पहिली पोस्ट सेवा सुरु केली.
१९४८ : मुंबई राज्यात कसेल त्यांची जमीन हा कुळ कायदा लागू झाला.
१९८३ : भारताचे माजी क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांनी वेस्ट इंडीज विरुद्ध ३० वे शतक पूर्ण करून सर डॉन ब्रॅडमन यांचा रेकॉर्ड तोडला.
१९८४ : राजीव गांधींच्या नेतृत्वामध्ये काँग्रेसने लोकसभेची निवडणूक जिंकली.
१९९५ : कझाकस्तान मधील बैकानूर अंतराळ तळावरून भारताच्या आयआरएस १-सी या दूरसंवेदन उपग्रहाचे प्रक्षेपण केले.
२००० : भारतीय डाक विभागाने वीरता पुरस्काराच्या सन्मानार्थ पाच पोस्टाचे तिकीटांचा एक सेट ३ रुपयांचे एक सचित्र तिकीट जारी केले.
२०१३ : आम आदमी पार्टी ने काँग्रेस सोबत गठबंधन करून दिल्ली मध्ये सरकार बनविले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५६ : वूड्रो विल्सन – अमेरिकेचे २८ वे राष्ट्राध्यक्ष आणि नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: ३ फेब्रुवारी १९२४)
१८९९ : गजानन त्र्यंबक तथा ग. त्र्यं. माडखोलकर – कादंबरीकार, समीक्षक आणि पत्रकार (मृत्यू: २७ नोव्हेंबर १९७६)
१९०३ : हंगेरीत जन्मलेला गणितज्ञ, भौतिकशास्त्रज्ञ, गणकशास्त्रज्ञ आणि अर्थशास्त्रज्ञ जॉन फोन न्यूमन यांचा जन्म.
१९११ : फणी मुजुमदार चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व पटकथा लेखक. दूरदर्शनवर लोकप्रिय झालेल्या 'रामायण' या मालिकेची पटकथा त्यांनी लिहिली होती. १९२२: अमेरिकन कॉमिक्स लेखक स्टॅन ली यांचा जन्म.
१९२६ : हुतात्मा शिरीषकुमार (मृत्यू: १० ऑगस्ट १९४२)
१९३२ : धीरुभाई अंबानी – उद्योगपती (मृत्यू: ६ जुलै २००२)
१९३७ : जगप्रसिद्धभारतीय उद्योजक रतन टाटा यांचा जन्म.
१९४० : ए. के. अँटनी – भारताचे परराष्ट्रमंत्री
१९४१ : भारतीय-पाकिस्तानी क्रिकेटर आणि प्रशिक्षक इंतिखाब आलम यांचा जन्म.
१९४५ : वीरेंद्र – नेपाळचे राजे (मृत्यू: १ जून २००१)
१९५२ : अरुण जेटली – केंद्रीय मंत्री व वकील
१९६९ : लिनक्स गणक यंत्रप्रणालीचा जनक लिनस तोरवाल्ड्स यांचा जन्म.
२००१ : अंडर-१९ च्या भातीय टीम चे सदस्य यशस्वी जैसवाल चा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६६३ : फ्रॅन्सेस्को मारिया ग्रिमाल्डी – इटालियन गणितज्ञ आणि भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: २ एप्रिल १६१८)
१९३१ : आबालाल रहमान – चित्रकार (जन्म: ? ? १८६०)
१९७१ : पंजाबी साहित्यिक नानकसिंग यांचे निधन.
१९७४ : राजस्थान चे पहिले मुख्यमंत्री हीरा लाल शास्त्री यांचे निधन.
१९७७ : सुमित्रानंदन पंत – छायावादी विचारधारेतील हिन्दी कवी (जन्म: २० मे १९००)
१९८१ : हिन्दी चित्रपटांत चार दशके चरित्र अभिनेत्याच्या भूमिका करणारे डेविड अब्राहम चेऊलकर तथा डेविड यांचे कॅनडातील टोरांटो येथे निधन झाले.
२००० : मेघश्याम पुंडलिक तथा मे. पुं. रेगे – तत्त्वचिंतक, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष (जन्म: २४ जानेवारी १९२४ वेंगुर्ला)
२००० : ध्रुपदगायक उस्ताद नसीर अमीनुद्दीन डागर यांचे निधन.
२००२ : पद्मश्री पुरस्काराने सन्मानित अच्युत कानविंडे यांचे निधन
२००३ : कृष्णाजी सुंदरराव तथा कुशाभाऊ ठाकरे यांचे निधन.
२००६ : प्रभाकर पंडित – संगीतकार व व्हायोलिनवादक (जन्म: ३० सप्टेंबर १९३३).

# गुणवत्तापूर्ण पेरुचे उत्पादन मिळवण्यासाठी हे करा

पेरुची प्रामुख्याने दोन पिके घेतात पावसाळी पीक (जुलै-ऑगस्ट) आणि हिवाळी हंगामातील पीक (नोव्हेंबर-जानेवारी). पावसाळी पिकांची फळे सामान्यत: चवीला रूक्ष असतात आणि त्यांची शेल्फ लाइफ खराब असते. तसेच या पिकावर फळमाशी व करपा रोगाचा प्रादुर्भाव जास्त आढळतो. हिवाळी हंगामातील पिकांची फळे आकार, दर्जा, चव आणि सुगंधाने श्रेष्ठ असतात आणि कीड आणि रोगांचा प्रादुर्भाव कमी असतो, त्यामुळे बाजारात त्यांना जास्त भाव मिळतो. मार्च-एप्रिलमध्ये मोठ्या प्रमाणात होणाऱ्या फ्लशमुळे, पावसाळी हंगामातील पेरुला भरपूर फुले येतात, तर हिवाळी हंगामातील पेरुला कमी प्रमाणात फुले येतात. अतिवृष्टीमुळे पावसाळी पेरुचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते त्यामुळे उत्पादकांना कमी भाव मिळतो. त्यामुळे पावसाळी हंगाम वगळून त्यावेळी योग्य नियोजन केल्यास हिवाळी हंगामातील पेरुचे गुणवत्तापूर्ण फळे मिळू शकतात.



छाटणी : पावसाळी पिकांना फुले येऊ नयेत म्हणून २० ते ३० एप्रिल दरम्यान २० किंवा ३० सें.मी. शेंड्याची छाटणी करावी.

सिंचन रोखणे : एप्रिल-मे दरम्यान झाडाला पाणी न दिल्यास पावसाळी पिकातील फुलांची गळती होतात. हिवाळी हंगामातील पिकांसाठी ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये जास्तीत जास्त फुले येणे गरजेचे असते, यासाठी जून महिन्यात झाडाला योग्य प्रकारे सिंचित करावे आणि शिफारशीत रासायनिक खते आणि शेणखत द्यावे. यामुळे जुलै ऑगस्ट मध्ये झाडाची चांगली वाढ होते.

मोहर गळ करणे : पावसाळी हंगामात फळे लागू नये पेरुच्या झाडावरील मोहर काढला जातो. लहान शेत असेल तर फुले हाताने देखील काढली जाऊ शकतात परंतु मोठ्या शेतात व्यावसायिक लागवडीमध्ये ते कष्टदायक आणि वेळखाऊ असते. मोठ्या प्रमाणात लागवडीसाठी, १०% युरिया (१० किलो युरिया १०० लिटर पाण्यात) किंवा ६०० पीपीएम एनए (नॅफ्थालीन ॲसिटिक ॲसिड) (६० ग्रॅम एनएए १५०-२०० मिली अल्कोहोलमध्ये विरघळवून १०० लिटर पाण्यात मिसळून द्रावण तयार करून झाडावर फवारणी करावी. मे महिन्यात जेव्हा जास्त प्रमाणात मोहर आलेला असतो तेव्हा ही फवारणी करावी.

फळांची गुणवत्ता सुधारण्यासाठी इतर इको-फ्रेंडली पद्धती : फळांना आच्छादित करणे- पंजाब कृषी विद्यापीठाने पावसाळी फळे झाकण्यासाठी पांढऱ्या न विणलेल्या पिशव्या वापरण्याची शिफारस केली आहे. परिपक्व हिरव्या कडक फळांना जूनच्या अखेरीपासून जुलैच्या मध्यापर्यंत (रंग तुटण्याच्या अवस्थेत) झाकण्यासाठी पिशवीचा वापर केल्याने फळमाशीच्या प्रादुर्भावापासून तसेच पक्षांपासून फळांचे संरक्षण होते, त्यामुळे फळाच्या सालीचा रंग सुधारतो. बॅगबंद फळांना बाजारात चांगला भाव मिळतो. फळमाशी सापळ्यांचा वापर – इको-फ्रेंडली फ्रूट फ्लाय सापळे बसवून फळमाशीच्या प्रादुर्भावाचे व्यवस्थापन केले जाऊ शकते. या सापळ्यांमध्ये फळातील माशीच्या नरांना आकर्षित करण्यासाठी फेरोमोन्स असतात जे त्यांच्या नैसर्गिक जीवनचक्रात व्यत्यय आणतात. फळ माशांच्या संख्येचे व्यवस्थापन करण्यासाठी जुलैच्या पहिल्या आठवड्यात फळमाशी सापळे १६ सापळे/एकर याप्रमाणात लावावेत.

इतर उपाय – फळमाशी प्रादुर्भावीत फळे नियमितपणे काढून जमिनीत खोल खड्ड्यात पुरावी. उन्हाळ्यात चांगली नांगरणी केल्याने ४-६ सेमी खोलीवर जमिनीत असलेल्या फळमाशीच्या अळ्या बाहेर पडतात व त्यांचे नियंत्रण होते. वरील सर्व उपायांचा अवलंब केल्यास उत्तम दर्जाची पेरू फळे मिळतात, आणि यातून चांगले चांगले आर्थिक उत्पन्न सुद्धा मिळू शकते. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी सुद्धा या उपायांचा अवलंब करण्यास हरकत नाही.

# माजलगाव तालुक्यात बोगस कामांचा सुळसुळाट; अधिकारी मात्र फरार

## कंत्राटदारासह अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करा–भाई ॲड.नारायण गोले

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यात बोगस कामाचा सुळसुळाट झाला असून बोगस कामाला आणि कंत्राटदाराला पाठीशी घालणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे चार महिन्यापासून सातत्याने चकरा मारून उपविभागीय अधिकारी मळेकर यांना भ्रमणध्वनीद्वारे वारंवार संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता उपविभागीय अभियंता श्री मळेकर हे भ्रमणध्वनी उचलत नाहीत म्हणून शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने सार्वजनिक बांधकाम उपविभाग माजलगाव या कार्यालयास बोगस कामाचा सुळसुळाट थांबवण्याबाबत अनेक वेळा निवेदन दिली.

तालुक्यातील बोगस कामाची सविस्तर माहिती मिळवण्याबाबत माहितीच्या अधिकाराखाली अर्ज दाखल केला असता त्या अर्जानुसार देखील उपविभागीय अभियंता मळेकर यांनी माहिती दिलेली नाही तसेच शुक्लतीर्थ लिमगाव ते पिंपरी खुर्द रस्त्याचे खड्डे बुजवण्याचे काम चालू असून या कामात कंत्राटदारासह अधिकाऱ्याचे हात ओले झाले असल्याने केवळ खडी टाकुन रस्त्याचे काम केल्याचे



नाटक केले जात आहे ही बाब उपविभागीय अभियंता मळेकर यांच्या कार्यालयांना निवेदनाद्वारे कळवली त्यानंतर देखील त्या कामात कुठलाही बदल झालेला नसल्याने दिनांक २६ डिसेंबर रोजी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील यांच्यासह कार्यकर्त्यांनी जायमोक्या वर जाऊन बोगस कामाची पाहणी केली असता डांबर न वापरता खड्डे बुजण्याचे काम कंत्राटदार करत असून या कंत्राटदाराला पूर्णपणे पाठीशी घालण्याचा विडा उपविभागीय अभियंता श्री मळेकर यांच्यासह त्यांच्या कार्यालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी उचलला असल्याचे दिसून आले जायमोक्या वरून उपविभागीय अभियंता यांच्यासह अनेक अधिकाऱ्यांना भ्रमणध्वनी द्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता श्री मळेकर, श्री स्वामी आदी अधिकाऱ्यांनी भ्रमणध्वनी न घेतल्याने कंत्राट दाराला पाठीशी घालण्या साठीच उपविभागीय अभियंता यांच्यासह त्यांचे कार्यालयाची धडपड दिसून आली ही बाब निंदनीय असून अधिकारी मळेकर हे गेल्या सहा महिन्यापासून भेटत नसल्यामुळे फरार आहेत..का? असा सवाल करत शेतकरी कामगार पक्ष अधिकाऱ्याची मनमानी खपवून घेणार नसून कामचुकार अधिकाऱ्याच्या हलगर्जी व निष्काळजी पणाबद्दल सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंत्र्याकडे तक्रार करून विधानसभेत शेतकरी कामगार पक्षाचे नेते आ. भाई डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्याकडून लक्षवेधी लावणार.. असल्याचे व कंत्राटदारा सह भ्रष्ट अधिकाऱ्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी करणार असल्याचे शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड. नारायण गोले पाटील, भाई मुंजा पांचाळ, भाई लक्ष्मण आप्पा चव्हाण, भाई विष्णू शेळक, भाई सावजी हांडे, भाई भास्कर कांबळे, परमेश्वर डाके, राजूभाऊ आव्हाड आदींनी केली आहे.

## थोडक्यात



### एकमेकांवर आरोप करणाऱ्या निवेदनावर माझ्या सहीचा संबंध नाही–महादेव महाराज

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील चुबळी गावचे सरपंच व ग्रामस्थांच्या वतीने दि.२०/१२/२०२४ रोजी निवेदन देण्यात आले होते की वाल्मीक कराड यांच्यावरील खोटे गुन्हे मागे घेण्याबाबत चुंबळी येथील सरपंच यांनी आपल्या कार्यालयास निवेदन दिले होते. परंतु लक्षात आले की निवेदनावर त्यांनी वस्ती रस्त्याचे कामाबाबतचे निवेदन दयावयाचे आहे.असे सांगून त्यांनी आमच्या सह्या सदरील निवेदनावर घेतलेल्या आहेत. वास्तविक पाहता वाल्मीक कराड यांच्यावरील खोटे गुन्हे मागे घ्या निवेदन दिले. जेव्हा आमच्या लक्षात आले यामध्ये आमचा काही संबंध नाही. गाव गाड्याच्या राजकीय प्रति शोधात एकमेकांवर आरोप करणाऱ्या निवेदनावर माझ्या सहीचा संबंध नाही असे चुबळी येथील ह.भ.प.महादेव महाराज यांनी निवेदन देते वेळीस सांगितले आहे त्यामुळे दि.२० /१२/२०२४ रोजी दिलेल्या सदरील विषयाच्या अनुषंगाने दिलेल्या निवेदनाचा आणि आमचा काहीही संबंध नसल्यामुळे त्या निवेदनावरील आमच्या सह्या ग्राह्य धरण्यात येवू नयेत असे निवेदन है.भ.प.महादेव महाराज पवळ आणि नरहरी यादवराव पवळ यांनी पाटोदा तहसील कार्यालय व पाटोदा पोलीस ठाणे येथे निवेदन देण्यात आले आहे या निवेदनावर दोघांच्या सह्या आहेत.

### विविध समाजांच्या संघटनांचा २८ तारखेच्या मोर्चाला पाठिंबा

बीड । प्रतिनिधी

२८ डिसेंबर रोजी बीडमध्ये होणार्या सर्वसमावेशक मोर्चाला विविध समाजांच्या संघटनांनी पाठिंबा दिला आहे. तसेच स्व.संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणीही या संघटनांनी केली आहे.

केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांचे अपहरण करून अमानुष मारहाण करून क्रुर हत्या केल्याच्या घटनेला तब्बल १५ दिवस उलटूनही अद्यापपर्यंत आरोपी आणि मुख्य सुत्रधार अटकेत नाहीत. स्व.संतोष देशमुख यांच्या हत्येचा निषेध आणि गुन्ह्यातील सुत्रधार व सर्व आरोपी यांना अटक करून फाशीची शिक्षा द्यावी या मागण्यांसह बीड जिल्ह्यातील विविध समाजाच्या संघटनांनी दि.२८ डिसेंबर रोजी होणार्या मूक मोर्चाला पाठिंबा दिला आहे. यामध्ये प्रामुख्याने मुस्लिम समाज बीड जिल्हा, राष्ट्रीय कॉंग्रेस ओ.बी.सी. विभाग बीड शहर, चर्मकार समाजाची संघटना संत रविदास प्रतिष्ठान, भटक्या विमुक्त जमाती संघटना, बेलदार समाज संघ, महाराष्ट्र राज्य परीट सेवा मंडळ, धनगर समाज महासंघ, राष्ट्रीय नाभिक संघटना, साळी समाज संघटना (मुरलीधरबुवाचा मठ), सुतार समाजाची विश्वकर्मा विराट संघ, राष्ट्रीय गुरव समाज महासंघ, कोष्टी समाजाचे श्री.चौंडेश्वरी देवी मंदिर ट्रस्ट या आणि अशा अनेक संघटनांनी बीड येथे होणाऱ्या सर्वसमावेशक मूक मोर्चाला पाठिंबा दिला आहे.

### चतुराबाई गुंजाळ यांचे निधन



चौसाळा येथील श्रमिक दूध सौस्थेचे माजी चेअरमन चंद्रसेन भगवान गुंजाळ यांच्या मातोश्री चतुराबाई भगवान गुंजाळ यांचे नुकतेच दि २६/१२/२०२४ रोजी दीर्घ आजाराने निधन झाले मृत्यू समई त्यांचे वय ९० वर्षाचे होते कै चतुरा बाई गुंजाळ यांचा मन मिळवू स्वभाव असल्या मुळे त्या सर्व परिचित होत्या त्यांच्या मागे चंद्रसेन भगवान गुंजाळ शहाजी भगवान गुंजाळ शिवाजी भगवान गुंजाळ हे तीन मुले दोन मुली सुना नातवंडे आदी परिवार आहे त्यांच्या अंत्यविधी विधिला गावातील व परिसरातील नागरिक माझी आमदार जिल्हा परिषद सदस्य परिसरातील सरपंच यांच्या सह परिसरातील असंख्य कार्यकर्ते आवर्जून उपस्तीस्त उपस्थित होते.

## गुरु गोविंद सिंह यांच्यावर आधारित चित्र प्रदर्शन



धारूर । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २६ डिसेंबर हा दिवस बाल दिवस म्हणून घोषित केला आहे त्या अनुषंगाने धारूर शहरातील सुजाण लॉन्स वर भारतीय जनता पार्टी च्या वतीने बाल दिवस साजरा करण्यात आला.

शिखांचे दहावे गुरु गोविंद सिंह यांनी देश,धर्म संस्कृती व सर्वांच्या संरक्षणासाठी आपल्या संपूर्ण कुटुंबाचे बलिदान दिले होते यांचे लहान पुत्र साहेब जाधव सिंह जी व बाबा फतेह सिंह जी यांच्या शहादत दिवसा च्या आठवणी मध्ये २६ डिसेंबर हा दिवस वीर बाल दिवस म्हणून साजरा केला जातो भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार व पर्यावरण पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या आदेश सर भाजपचे प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा नगर अध्यक्ष डॉ. स्वरूपसिंह हजारी व जिल्हा संयोजक विक्रांत हजारी यांच्या मार्गदर्शनाखाली धारूर येथील सुजाण लॉन्स या ठिकाणी वीर बाल दिवस साजरा करण्यात आला यावेळी शहरातील विद्यार्थ्यांसाठी भव्य चित्र प्रदर्शन भरवण्यात आले होते या कार्यक्रमास धारूर शहराचे माजी नगराध्यक्ष डॉ. स्वरूप सिंह हजारी भाजप तालुका अध्यक्ष बाळासाहेब चोले शहराध्यक्ष दत्ता भाऊ धोत्रे युवा मोर्चाचे अध्यक्ष गणेश बडे युवा मोर्चाचे शहराध्यक्ष मोहन भोसले रोहन सिंह हजारी, सचिन दुबे, सुरेश लोकरे राम ,प्रभू मुंडे, माणिक लोखंडे अक्रम, मल्हारी भालेराव साहेबराव चव्हाण व विद्यार्थी पालक शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

## पारंबी इंटरनॅशनल फिल्म फेस्टीवलमध्ये 'डियर रिव्हर' ठरला सर्वोत्कृष्ट चित्रपट

माजलगाव । प्रतिनिधी

नुकत्याच मुंबई येथे झालेल्या 'पारंबी इंटरनॅशनल फिल्म फेस्टीवल–२०२४' च्या स्पर्धेत जगभरातुन आलेल्या हजारो चित्रपटाना मागे टाकत भास्करनाना शिंदे फिल्म प्रॉडक्शनची पहिलीच निर्मिती असलेला 'डियर रिव्हर' (प्रिय नदीस) या लघुपटाने बाजी मारत बेस्ट फिल्म चे प्रथम क्रमांकाचे पारितोषीक मिळवले. तर याच लघुपटासाठी लेखक आर. प्रकाश यांनी बेस्ट रायटर म्हणून प्रथम क्रमांकाचे बक्षिस पटकावले. या फेस्टीवलचे पहिल्या फेरीचे कल्पेश राणे यांनी तर फायनल फेरीचे परीक्षण प्रसिद्ध अभिनेते दिग्दर्शक विजय पाटकर यांनी केले व त्यांच्याच हस्ते 'डीयर रिव्हर' च्या सर्व टिमचा सन्मान करण्यात आला. विजय पाटकर यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात बोलताना म्हणाले की, डियर रिव्हर (प्रिय नदीस) या सिनेमाने मी खूप भारावुन गेलो आहे. हा सिनेमा



'डियर रिव्हर' ची संहिता खूपच सशक्त आहे. मराठवाड्याच्या मातीशी नाळ असणाऱ्या या विषयाने माझ्या मनात कायमचे घर केले आहे.
–विजय पाटकर (मुख्य ज्युरी तथा प्रसिद्ध अभिनेते व दिग्दर्शक )

रुढार्थाने पारंपारिक चित्रपटाची चौकट मोडुन काढतो त्यामुळे एका वेगळ्या विषयाला हात घातल्या बद्दल त्यांनी निर्माते भास्करनाना शिंदे यांचे विशेष कौतुक केले.

तर चित्रपटाचे दिग्दर्शक विष्णू उगले यांच्याही पाठीवर त्यानी कौतुकाची विशेष थाप मारली. त्याच बरोबर या चित्रपटाचे डीओपी व संकलन करणारे अमर देवणे यांच्या कामाबद्दलही ते उत्साहाने बोलले.या चित्रपटात चि. प्रसनजित शिंदे, ॲड.पुजा देडे, बद्रीनाथ खंडागळे,भिमराव घोडेराव आदी कलावंतानी काम केले आहे. तसेच तांत्रिक बाजू सुभाष कांबळे, सौरभ धापसे व निकेश भांगे यांनी सांभाळली आहे.

## माजलगाव भाजपाच्या वतीने सक्सेस पब्लिक स्कूलमध्ये बालदिन

माजलगाव । प्रतिनिधी

केंद्र शासनाने दि २६ डिसेंबर हा बालदिन साजरा व्हावा म्हणून मोदी सरकारने २०२२ मध्ये जाहीर केले होते.याचाच एक भाग म्हणून दि २६ डिसेंबर गुरुवार रोजी शहरातील सक्सेस पब्लिक स्कूलमध्ये बाल दिवस संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून भाजपा तालुकाध्यक्ष अरुण राऊत तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष डॉक्टर अशोक तिडके होते.या बाल दिवसाचे महत्त्व काय हे सांगताना नगरसेवक विनायक रत्नपारखी म्हणाले २०२२ पासून २६ डिसेंबर हा वीर बाल दिवस म्हणून साजरा करण्याचे मोदी सरकारने जाहीर केले ,व या २६ डिसेंबर रोजीच गुरु गोविंद सिंह यांचे दोन पुत्र फतेह सिंग आणि जोरावर सिंग यांचे सहा व आठ अशी वय होते.त्यावेळी नवाब वजीरखान त्यांना सांगतात आपण इस्लाम धर्म स्वीकारा नाहीतर मरणाला सामोरे जावे लागेल,मात्र याप्रसंगी जीवाची परवा न करता तेवढ्याच बाणेदारपणे विचारतात इस्लाम धर्म स्वीकारला तर मरण येणार नाही का आणि मरण येणारच



असेल तर आपल्या धर्मात राहून धर्मासाठी बलिदान करत मरण पत्करू असे उत्तर दिले व त्यानंतर या दोघांनाही भिंतीत चिनून विटा बांधून मारण्यात आले, मानेपर्यंत विटा बांधल्या झाल्या त्यावेळी पिता जोरावर सिंह रडायला लागले कारण काय तर तू माझ्यापेक्षा लहान असताना या जगात नंतर आलास आणि माझ्या आधीच चाललास , पण तुझे हे शौर्य धैर्य पाहून बलिदानाची तुझी उंची किती मोठी आहे हे या धर्मनिष्ठा, राष्ट्रनिष्ठावरून दिसून येते.आणि याचाच एक भाग म्हणून या दिवशी बाल दिवस म्हणून संपन्न व्हावा म्हणून देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी सरकारने २६ डिसेंबर हा बाल दिन म्हणून संपन्न व्हावा असे जाहीर केले.यातून विद्यार्थ्यांनी एक लक्षात घ्यावी की ही लहान मुले आलेल्या संकटाला न घाबरता जीवाची परवा न करता सामोरे जातात,तसे आपण देखील कुठल्याही कठीण प्रसंगाला घाबरून न जाता त्याला सामोरे जाण्याचे शिकले पाहिजे. शीख पंथ हा हिंदूंचा सुरक्षा कवच म्हणून मानला जातो, गुरुगोविंद सिंहजी यांनी धर्म रक्षणासाठी पूर्ण समाजाला एकत्र केले,समाजाचे लढाऊ पण धर्म रक्षणासाठी जागविणारे श्रेष्ठ गुरुगोविंद सिंह जी यांच्या सर्व परिवाराने २१ ते २७ डिसेंबर या कालावधीत अतुलनीय बलिदान दिले म्हणूनच हा सप्ताह शौर्य सप्ताह म्हणून पाळला जातो, म्हणूनच देश धर्म समाज यांच्यासाठी गुरूंच्या सर्व परिवाराने बलिदान दिले त्यांच्या या बलिदानामुळेच आजही आपला धर्म आणि देश आणि आपण अजूनही टिकून आहोत,आणि दुर्दैव हेच आहे की या जाज्वल्य पराक्रमी आणि स्मृतिदय इतिहास आम्हाला माहितीच नाही, आणि म्हणून अशा वीरांचा आदर्श हा सर्वासमोर ठेवणे गरजेचे आहे यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हा बाल दिवस २६ डिसेंबर रोजी साजरा करण्याचे ठरवले, आणि त्याचाच एक भाग म्हणून आज आपण या ठिकाणी सर्वांना इतिहास कळावा म्हणून हा बालदिन आपण या ठिकाणी साजरा करत आहोत.या कार्यक्रमा प्रसंगी भाजपा तालुकाध्यक्ष अरुण राऊत,माजी नगराध्यक्ष अशोक तिडके, सत्यनारायण उनवणे,प्रल्हाद दळवी,खुरपे सह यशवंत पब्लिक स्कूलचे अध्यक्ष निखिल वाघमारे,मुख्याध्यापक निरंजन वाघमारे,शेंडगे सर व सर्व शिक्षक कर्मचारी वृंद विद्यार्थी उपस्थित होते.

## जिव्हाळा ग्रुपच्या वतीने गड–किल्ल्यांवर पदभ्रमंती



माजलगाव । प्रतिनिधी

येथील जिव्हाळा ग्रुपच्या वतीने महाराष्ट्रातील हरिश्चंद्रगड, रतनगड,कळसुबाई शिखर या ठिकाणी २२ ते २५ डिसेंबर दरम्यान पदभ्रमंती करण्यात आली.

सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या जिव्हाळा ग्रुपच्या वतीने प्रत्येक वर्षी वृक्षारोपण, रक्तदान शिबिर हे कार्यक्रम घेण्यात येतात. प्रत्येक वर्षी डिसेंबर महिन्यात जिव्हाळा ग्रुपच्या वतीने गड किल्ल्यांवर पदभ्रमंती करण्यात येते.यापूर्वी जिव्हाळा ग्रुपच्या वतीने मकरंदगड, प्रतापगड,तुंग, तिकोना,लोहगड विसापूर,हडसर, जीवधन,चावंड, मुरुड जंजिरा, सुधागड,साल्हेर, मुल्हेर, हरिहरगड, भास्करगड, दुर्गभंडार या किल्ल्यांवर पदभ्रमंती करण्यात आली. यावर्षी जिव्हाळा ग्रुपच्या वतीने हरिश्चंद्रगड, रतनगड,कळसुबाई शिखर या किल्ल्यांवर पदभ्रमंती करण्यात आली.हरिश्चंद्रगड समुद्रसपाटीपासून १२२४ मीटर उंच आहे.या किल्ल्यावर हरिश्चंद्र मंदिर,कोकणकडा आणि विस्तीर्ण पठार आहे, रतनगड समुद्रसपाटीपासून १२९७ मीटर उंच आहे.या किल्ल्यावर गुहेतील रत्नादेवीचे मंदिर आहे.याच किल्ल्यावर प्रवरा नदीचे उगमस्थान आहे.या किल्ल्यावर पिवळ्या फुलांचा गालीचा पसरला आहे.कळसुबाई शिखर हे समुद्र सपाटीपासून १६४६ मीटर उंच आहे. हे महाराष्ट्रातील सर्वात उंच ठिकाण आहे.या ठिकाणी कळसूआईचे मंदिर आहे.या गड किल्ल्यावरील पद भ्रमंती मोहिमेमध्ये डॉ.अजयसिंह डाके, डॉ.राजेश रुद्रवार, सतीश सोळंके, नारायण टकले, बालासाहेब झोडगे, ॲड. सतीश शिंदे, सुदाम बादाडे, राजाभाऊ आढाव, नितीन मुंदडा, संदीप शिनगारे, दिलीप तौर, प्रकाश डाके, गोविंद कराड, डॉ. सुनील मोरे, जगदीश पोपळे, पुरुषोत्तम माने, विठ्ठल धुमाळ, विनोद जाधव, नागनाथ हंगरगे, श्रीमंत राऊत, दत्ता भुजबळ, किशोर दहिवाळ, रामप्रसाद घायतिडक, नंदकुमार पैठणकर, शंकर राऊत, किरण माने हे सहभागी झाले होते.

सह्याद्री पर्वतावरील गड किल्ले हे महाराष्ट्राचे वैभव आहे. जिव्हाळा ग्रुप या गड किल्ल्यांवर मागील सात वर्षांपासून पदभ्रमंती करत आहे.यामुळे आपल्याला समृद्ध इतिहासाची जाणीव होते.
–सतीश सोळंके
(गड किल्ले ट्रेकर)

**मा.श्री ओ.एन. मंत्री साहेब, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १८१९/२०२४**
**बालिका पांडुरंग शेळके विरूध्द निरंक**

अर्जदार : १. बालिका भ्र. पांडुरंग शेळके, वय ३९ वर्षे, धंदा घरकाम, २. पांडुरंग पि. रामभाउ शेकळे वय ४३ वर्षे, धंदा शेती, दोघे रा. जुजगव्हाण, ता. जि. बीड विरुध्द निरंक

मागणी – बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत महेश पि. पांडुरंग शेळके, यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी मयत महेश पि. पांडुरंग शेळके, यांचा मृत्यु दिनांक २२/०५/२०२४ रोजी झाला आहे. यांचे मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत महेश पि. पांडुरंग शेळके, यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत महेश पि. पांडुरंग शेळके, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २०/१२/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दिनांक २१/०१/२०२५ आहे.

आदेशावरून
स्वाक्षरित
**क.लि.**

**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर, बीड

**जाहीरनामा**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार आष्टी यांचे न्यायालयात**
**(दंड–विभाग)** ता. आष्टी जि. बीड
Email ID : tahsildarasti@gmail.com
क्र.२०२४/दंड/जन्म/मृत्यू नोदणी/कावी
दूरध्वनी. क्र. (०२४४१) २८२५४२
दि. १७/१२/२०२४

**जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत**

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये

सर्व जनतेस मौजे. जामगाव, ता. आष्टी आही. यांना जाहीर केले जाते कि अर्जदार श्री. ईश्वर भागवत देशमुख रा. जामगाव ता. आष्टी जि.बीड यांची जन्म दि. २०/०५/२००८ रोजी मौजे. जामगाव येथे झाला असून अर्जदारास सदरहू जन्माची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. करीता सदरहू अर्जदाराचे स्वतःचे कायदेशीर जन्माचे दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत झाल्यास त्याना सदरहू अर्जदाराचे जन्माचे नोंद कायदेशीर असल्याबावतचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दि. १७/१२/२०२४ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

आदेशावरुन
स्वाक्षरीत
**कार्यकारी अधिकारी तथा**
**नायब तहसीलदार,आष्टी**

**जाहीरनामा**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय,आष्टी जिल्हा बीड**
**दंड विभाग**
दूरध्वनी. क्र. (०२४४१) २८२५४२
Email ID : tahsildarasti@gmail.com
क्र. २०२४/दंड/जन्म मृत्यूची नोंदणी/कावि २७६
दिनांक १२/ १२/२०२४

**जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत**

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी सुधारणा कायदा २०२३ मधील कलम ११(३) अन्वये सर्व जनतेस मौजे जामगाव तालुका आष्टी यांना जाहीर केले जाते की अर्जदार श्री ज्ञानदेव नामदेव रणसिंग राहणार जामगाव तालुका आष्टी जिल्हा बीड यांनी त्यांचा मुलगा नामे स्वप्निल नामदेव रणसिंग याचा जन्म दिनांक ०१/०१/ २०१४ रोजी जामगाव तालुका आष्टी येथे झाला असून अर्जदारास सदर जन्मची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे करिता सदरहू अर्जदाराचे मुलाचे कायदेशीर जन्माचे दिनांक कायदेशीर नवे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकतीने दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहू अर्जदार यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक १२/ १२/ २०२४ रोजी माझी सही व शिक्यानिशी दिले.

आदेशावरुन
स्वाक्षरीत
**कार्यकारी अधिकारी तथा**
**नायब तहसीलदार,आष्टी**

# जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यास उशीर, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान




अंबाजोगाई । प्रतिनिधी

जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. जात वैधता प्रमाणपत्र विभागात अत्यंत संथ गतीने काम सुरू असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष धोक्यात आले आहे. विधानसभेच्या निवडणूकीच्या आगोदर विद्यार्थ्यांनी जात पडताळणीसाठी ऑनलाइन अर्ज दाखल केलेले आहेत आणि ऑफलाइन सुद्धा कागदपत्रे सादर केलेली आहेत. परंतु आजही विद्यार्थी ऑनलाइन अर्जाची स्थिती पाहतात तेव्हा प्रलंबित (पेंडिंग) असेच दाखवत आहे. कासव गतीच्या कामामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणीक कामात अडचणी निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

अकरावी व बारावी विज्ञान शाखेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक असते. विद्यार्थ्यांनी दिवाळीच्या अगोदरच हे प्रमाणपत्र ऑनलाईन करून बीड येथील सामाजिक न्याय विभागात सादर केले आहेत. प्रमाणपत्र मिळत नसल्याने अनेक ◀◀ पान ३ वर

# पत्रकार संग्राम धन्वे यांना जिवे मारण्याची धमकी

## पत्रकार संरक्षण कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल

बीड । प्रतिनिधी

बुधवार दिनांक २५ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास अंबिका चौकामध्ये सा.शिवसुर्य तथा मराठी महाराष्ट्राचे संपादक संग्राम धन्वे यांना दोन अनोळखी तरुणांनी शिवीगाळ करत मारहाण केली. संपादक संग्राम धन्वे यांच्या फिर्यादीवरून बीड शहरातील शिवाजी नगर पोलिस ठाण्यात दोघांविरोधात पत्रकार संरक्षण कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी आहे की दि.२५ डिसेंबर २०२४ रोजी बीड शहरातील अंबिका चौक येथे वाहतूक शाखेच्या वतीने ध्वनिप्रदूषण कमी करण्याच्या कारणाने दुचाकी रॉयल इनफील्ड. एम.एच. १४ बी. डब्ल्यु ६३०३ या (बुलेट) च्या कर्कश आवाजाने सायलेंसर काढून घेण्याची कारवाई सुरू असताना पत्रकार संग्राम धन्वे हे अंबिका चौकतून जात होते पोलिसांची कारवाई सुरू असल्याचे निदर्शनास आले.

ती कारवाई सुरू असल्याचे पाहून संग्राम धन्वे यांनी सदरील कारवाईचे बातमीकामी व्हिडिओ चित्रीकरण केले. त्यानंतर सदरील दुचाकीवरील दोन तरुण धाऊन आंगावर आले आमच्या गाडीची व्हिडीओ का काढतो म्हणत धक्काबुक्की करत मारहाण केली. त्यावेळी वाहतूक शाखेचे पोलिस उपनिरिक्षक सानप व वाहतूक शाखेचे कर्मचारी वाघमारे हे उपस्थित होते. त्या अधिकाऱ्यांनी संग्राम धन्वे यांना सुरक्षा दीली असे संग्राम यांनी सांगीतले.

मात्र गर्दीचा फायदा घेत त्यांनी पत्रकार धन्वे यांना मारहाण केली. तर दूचाकी स्वार जाता जाता असेही म्हणाले की पोलीस असल्यामुळे तू वाचला तू बाहेर ये तुला जिवंत सोडणार नाही अशी धमकी देत सदरील तरुण दुचाकीवर बसून निघून गेले.

त्यामुळें संग्राम धन्वे यांच्या फिर्यादीवरून महाराष्ट्र राज्यातील प्रसारमाध्यमातील व्यक्ती आपली कर्तव्ये पार पाडत असताना त्यांच्यावर होणाऱ्या हिंसक कृत्यांना ◀◀ पान ३ वर

# प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यामुळे उपविभागीय अधिकारी कार्यालयाचा गलथान कारभार

अंबड । प्रतिनिधी

**शासकीय कार्यालय हे जनतेच्या सुविधेसाठी व कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी असते. घनसावंगी व अंबड येथील प्रशिक्षणार्थी असलेले अधिकारीमुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामासाठी लागणारी महत्वाची कागदपत्रे लवकर मिळत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे.**

घनसावंगी व अंबड साठी सर्वसामान्य लोकांना सोयीसाठी

अंबड येथे उपविभागीय अधिकारी कार्यालय आहे. परंतु इथे प्रशिक्षणार्थी अधिकारी असल्याने कोणत्याच कर्मचाऱ्यांना काही ताळमेळ लागाना याकरता कायमस्वरूपी उपविभागीय अधिकारी देण्यात यावे अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांकडून करण्यात येत आहे . प्रशिक्षणार्थी असल्याने उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना चकवा देऊन तहसील कार्यालय मधील महसूल विभागाचे काही कर्मचारी बालाजी दक्षिणा म्हणून महसूल नावाखाली पैसे गोळा करीत आहे असे बोलले जात आहे. कायदा व सुव्यवस्था राखणे, विकासात्मक कामांवर देखरेख ठेवणे आणि उपविभागातील विविध विभागांशी समन्वय साधने, त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या व जनतेच्या शैक्षणिक कामकाजाबरोबरच महत्त्वपूर्ण कामकाजासाठी वैधानिक प्रमाणपत्र जारी करण्याचे कार्य उपविभागीय अधिकारी कार्यालयाअंतर्गत होते.

परंतु, अंबड येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या गलथान कारभारामुळे विद्यार्थ्यांसह सर्वसामान्य जनतेला नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. यात सर्वात जास्त विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला खीळ बसत असल्याचे पाहायला मिळत आहे. सेतू सुविधा केंद्रातून रीतसर ऑनलाईन अर्ज करून देखील बेजबाबदार कर्मचारी व अधिकाऱ्यांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. जिल्हाधिकारी यांनी अनुभवी असलेले उपविभागीय अधिकारी देण्यात यावे अशी मागणी होत आहे. कार्यप्रणालीस वरिष्ठांनी अंकुश लावणे गरजेचे असल्याची मागणी विद्यार्थ्यांबरोबरच पालक वर्गातूनही करण्यात येत आहे.

# जनक्षोभ लक्षात घेता, निरपेक्ष भावनेतून कडक कारवाईची गरज – राजेंद्र मस्के

## सामान्य जनता लाखोच्या संख्येने महानिषेध मूक मोर्चात सामील होतील



बीड । प्रतिनिधी

मुख्यमंत्र्यांच्या शब्द आणि कृती मध्ये प्रचंड तफावत असुन, पोलीस अठरा दिवसांत आरोपी अटक करू शकले नाहीत. तर फाशीची शिक्षा कधी मिळणार ? आजही पोलीस कोणाच्या दबावाखाली येऊन काम करत आहेत का हा प्रश्न उपस्थित होतोय. निरापराध सरपंच स्वर्गीय संतोष देशमुख यांची क्रुर हत्या झाली. आरोपींची नावे पुढे आली. मास्टर माईंड कोण आहे, याचा वेध जनतेनी घेतला. परंतु आरोपी व मास्टरमाइंड पर्यंत पोलीस पोहचू शकले नाहीत. संतप्त जनतेची भावना शासन जाणीवपूर्वक लक्षात घेत नाही. यामुळे कमालीची चिड निर्माण झाली. मनातील खद खद व असंतोष प्रकट करण्यासाठी जिल्ह्यातील लाखो लोक आज महानिषेध मोर्चाच्या निमित्ताने रस्त्यावर उतरणार आहेत. आरोपींना अटक करण्यास होणारा विलंब राज्य सरकारला नक्कीच परवडणारा नाही. शासनाने जनतेच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये. सामान्यजनांचा जनक्षोभ लक्षात घेऊन शासनाने निरपेक्ष भावनेतून कडक पाऊल उचलावे, असे आवाहन शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांनी केले.

संपूर्ण राज्यभर स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या क्रूर हत्येची निंदा चालू आहे. जिल्हाभरातील सामान्य जनता व देशमुख कुटुंबीयांनी आरोपी व मास्टरमाईंड यांना तातडीने अटक करा अशी आर्त विनवणी केली जात असताना सुद्धा आरोपींना अटक करण्यास विलंब होत आहे. शासनाचे डोके ठिकाणावर आणण्यासाठी बीड जिल्ह्यातील सर्व जाती धर्मातील, सर्व पक्षातील लोकांनी पुढाकार घेऊन हा महानिषेध मोर्चा आयोजित केला. शनिवार दि. २८ डिसेंबर रोजी सकाळी ११.०० डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास अभिवादन करून हा मोर्चा माळीवेसचौक सुभाष रोड साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे चौक बस स्थानक छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिल्हाधिकारी कार्यालयावर हा मोर्चा धडकणार आहे.अन्यायाला वाचा फोडणाऱ्या या मोर्चात जास्तीत जास्त संखेने जनतेने सहभागी व्हावे ही आग्रहाची विनंती.

# किसनराव खेडकर यांचे दुःखद निधन



शिरूर । प्रतिनिधी

**तालुक्यातील फुलसांगवी येथील रहिवासी असलेली किसनराव त्रिंबक खेडकर (नाना ) यांचे शुक्रवार दि. २७ डिसेंबर रोजी दुपारी ३:१० वाजता वयाच्या ९४ व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले असून त्यांचा शनिवार दि. २८ डिसेंबर रोजी सकाळी १०:०० वाजता अंत्यविधी होणार आहे.**

स्वातंत्र्यानंतर फुलसांगवी, हाजीपुर, मार्कडवाडी या ग्रुपवर ग्रामपंचायतची स्थापना झाल्यानंतर या ग्रामपंचायत ची प्रथम सरपंच म्हणून किसनराव त्रिंबक खेडकर (नाना ) सलग पंधरा वर्ष काम पाहिले होते तर येथील सेवा सोसायटीचे सचिव म्हणून त्यांनी सुमारे ३५ वर्ष काम पाहिले होते. या कार्यकाळामध्ये फुलसांगवी येथील जिल्हा परिषद शाळा ही नानांच्या प्रयत्नातून मिळाली होती. त्याचबरोबर श्री.संत वामनभाऊ महाराज पुण्यतिथी निमित्त होणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताह आला आहे खतपाणी घालण्याचे काम नानाने मोठ्या प्रयत्नाने केले होते. सप्ताह समितीमध्ये राहून सप्ताहाची व्यापकता वाढवण्यासाठी त्यांनी मोठे प्रयत्न केले होते. वयाच्या ९४ या वर्षी गेल्या पाच सात दिवसापासून त्यांची प्रकृती खालावली होती. अखेर शुक्रवार दि. २७ डिसेंबर रोजी दुपारी ३:१० वाचता त्यांनी राहत्या घरी अखेरचा श्वास घेतला. किसनराव खेडकर यांच्या निधनाची बातमी कळताच घराकडे ◀◀ पान ३ वर

# वात्रटिकाकार मसने यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार



अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील श्री योगेश्वरी नूतन विद्यालयाचे आदर्श व विद्यार्थीप्रिय शिक्षक तथा वात्रटिकाकार, लेखक भागवत रामकृष्ण मसने यांना मैत्रा फाउंडेशन बीड चा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. सांस्कृतिक विभाग प्रमुख , कवी, वात्रटिका कार, लेखक भागवत मसने यांनी पाच एकांकिका व पाच समाज प्रबोधन पर गीते लिहून विद्यार्थ्यांच्या समूहाद्वारे बीड आकाशवाणी वरती सादर करून शाळेला बक्षीस मिळवून दिले आहेत .

राज्यात विविध कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून त्यांना आमंत्रित केले जाते . तसेच जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय व विभागीय स्तरावच्या वादविवाद स्पर्धा आणि वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षण ◀◀ पान ३ वर

# मुकुंदराज यात्रेनिमित्ताने भाविकांनी परिसर फुलून गेला



अंबाजोगाई । प्रतिनिधी

मराठीचे आद्यकवी मुकुंदराजांच्या समाधिस्थळी भरलेल्या यात्रेत भाविकांनी मोठी गर्दी केली. मुकुंदराज हे नाथपंथीय संत आदिनाथ, हरीनाथ, रघुनाथ अशी त्यांची परंपरा आहे. आद्यकवी म्हणून त्यांची ओळख जगभरात असून त्यांचे १२ वे शतक समजले जाते.

अंबाजोगाई येथे मुकुंदराजांची समाधी आहे. शंकराचार्यांच्या अद्वैत तत्वज्ञानाचे अनुयायी होते. त्यांनी विवेक सिंधु आणि परमामृत यासह इतर धार्मिक ग्रंथ लिहिले विवेकसिंधू मराठी भाषेतील साहित्याची ही पहिली रचना मानली जाते.

सफला एकादशीनिमित्त दरवर्षी मुकुंदराजांची यात्रा भरते. व्दादशीला यात्रेचा समारोप होतो. सकाळीच मुकुंदराजांच्या दर्शनासाठी भाविकांनी रांगा लावल्या होत्या यात्रेदरम्यान बाहेरून आलेल्या यात्रेकरूंनी आद्यकवी मुकुंदराजांच्या समाधीचे दर्शन घेऊन यात्रेचा आनंद घेतला.डोंगर दऱ्याचा परिसर भाविकांनी फुलून गेला होता. यात्रेत ◀◀ पान ३ वर

# भाजीपाला मार्केटसाठी जागा द्या नसता नगरपरिषदमध्ये बाजार भरवणार –शेख रशिद



## केळी मार्केट ऐवजी भाजीपाला मार्केटसाठी जागाची मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगांव शहराचा विस्तार वाढत असुन शहरात नगरपरिषद प्रशासनकडे कोणतीही सुविधा सामान्य नागरिकांना देण्यात येत नाही तर मुख्याधिकारी महिना महिना नगरपरिषद मध्ये येत नाही व अधिकारी,कर्मचारी झोपेचं सोंग घेऊन सामान्य नागरिकांनी विचारले प्रश्न सोडुन उलट सुलट उत्तरे देऊन टाळाटाळ करत आहे.

सध्या माजलगाव शहरात भाजीपाला विक्रेते पावर हाऊस रोड,हनुमान चौकमध्ये सर्रास हात गाड्या लावुन रहदारी करणार्या सामान्य नागरिकांना त्रास होत आहे तसेच दवाखाने, मंदिर, मस्जिद, शाळा, महाविद्यालय, विद्युत कार्यालय,पोस्ट ऑफिस अशी महत्त्वपूर्ण कार्यालय असुन पावर हाऊस रोड, हनुमान चौक मध्ये चार चाकी, दोन चाकी गाडींची रहदारी मोठ्या प्रमाणात असते त्यामुळे मोठी दुर्घटना घडतील हयाची शक्यता आहे त्यामुळे नगरपरिषद प्रशासनाने तात्काळ पावर हाऊस रोड, हनुमान चौक मधील भाजीपाला विक्रेते,हातगाड्या हटवुन नगरपरिषद ने जुन्या नगरपरिषद समोरील केळी मार्केट येथील जागा भाजीपाला मार्केटसाठी देण्यात यावे नसता लोकशाही मार्गाने माजलगाव नगरपरिषद मध्ये बाजार भरवण्यात येईल हयाची नोंद घ्यावी असा इशारा समाजसेवक शेख रशिद यांनी सांगितले आहे.

# संघर्षशील व्यक्तिमत्व असणारे ज्येष्ठ विधीज्ञ ॲड.अविनाश गंडले यांचा वाढदिवस उत्साहात साजरा



बीड । प्रतीनिधी

बीड जिल्हा वकील संघाचे माजी अध्यक्ष, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, कार्यात सतत अग्रेसर असणारे मार्गदर्शक ॲड.अविनाशजी गंडले साहेब यांचा ५४ वा वाढदिवस मोठ्या उत्साहात बीड जिल्हा न्यायालयाच्याप्रांगणात संपन्न झाला या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विधींज्ञ ॲड . बाहेगव्हाणकर एम.आय.एम.चे जिल्हाध्यक्ष ॲड.शेख शफीक भाऊ, सामाजिक कार्यकर्ते, जावेद भाऊ कुरेशी, सामाजिक कार्यकर्ते ॲड राहुल मस्के. वकिल संघाचे विद्यमान अध्यक्ष ॲड. येवले , उपाध्यक्ष ॲड.नितीन वाघमारे,सचिव ॲड.यासेर पटेल,ॲड.विवेकानंद सानप, ऍड .प्रवीण राख मुख्य जिल्हा सरकारी अभियोक्ता अँड.अजय राख, अँड.. सदानंद राऊत, अँड. राजापूरकर, ॲड.विनयक जाधव, ॲड.अजय तांदळे, ॲड. पिसुरे, ॲड.प्रभाकर आंधळे, सहायक सरकारी अभियोक्ता ॲड.अनिल तिडके, अँड.विठ्ठल मुळे, अँड..सुहास महाजन, अँड.तेजस वडमारे, अँड. . कोरडे,ॲड. तेजस नेहरकर, ॲड. प्रशांत दगडखैर, ॲड. किरण देशपांडे, अँड..दिनेश हंगे, अँड.जयंत राख, अँड.प्रकाश गलांडे, अँड.कपिल भैरट, अँड.काळे पत्रकार सुनील डोंगरे, प्रा.विक्रम धनवे, भा.ज.पा.च्या अँड.संध्या राजपुत , अँड.राहूल हजारे, अजय लांडगे, सामाजिक कार्यकर्त्या मनीषा तोकले, अशोक तांगडे, अविनाश जावळे, सुधाकर धुरंधरे असे असंख्य विधीज्ञ सामाजिक कार्यकर्ते मित्रपरिवार मोठ्या प्रमाणात या वाढदिवसाच्या निमित्ताने उपस्थित होता. यावेळी अनेकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या व वाढदिवसानिमित्त ◀◀ पान ३ वर

# गंगाई– बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन

आष्टी । प्रतिनिधी

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, आष्टीचे संस्थापक– अध्यक्ष माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या आई– वडिलांच्या स्मृतीप्रित्यर्थ मागील २० वर्षापासून येथील भगवान महाविद्यालयामध्ये गंगाई– बाबाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. या महोत्सवामध्ये विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवरांना गंगाई –बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येते. यावर्षी ३० जानेवारी २०२४ ते १ फेब्रुवारी २०२५ या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आलेला गंगाई– बाबाजी महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. या महोत्सवामध्ये महाविद्यालयीन वक्तृत्व , काव्यवाचन स्पर्धा व खुल्या लावणीनृत्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

१ फेब्रुवारी २०२५ रोजी विविध क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना गंगाई –बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. यामध्ये आदर्श माता– पिता, धार्मिक क्षेत्र, सामाजिक क्षेत्र, साहित्य क्षेत्र, कला क्षेत्र, कृषी क्षेत्र, शिक्षण क्षेत्र (प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन), क्रीडा क्षेत्र, पत्रकारिता, आदर्श ग्रामविकास अधिकारी, आदर्श तलाठी व आदर्श सरपंच या क्षेत्रांचा समावेश आहे. या क्षेत्रापैकी कोणत्याही क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य असणाऱ्या मान्यवरांनी ◀◀ पान ३ वर

# स्व.संतोष देशमुख यांच्या परिवारासाठी धारूरकर सरसावले

## एक हात मदतीचा या उपक्रमाला सर्व पक्षीय ,सर्व धर्मीय लोकांची साथ स्व.संतोष देशमुख कुटुंबासाठी काढण्यात आलेल्या मदत फेरीत लोकांनी सढळ हाताने मदत केली या मदत फेरीत तीन लक्ष तेरा हजार रुपयाची आर्थिक मदत जमा झाली




किल्ले धारूर । प्रतिनिधी

**केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे ९ डिसेंबर रोजी अपहरण करून खून करण्यात आला होता देशमुख हे सरपंच जरी असले तरी त्यांची परिस्थिती हालाखीची आहे त्यांच्या जाण्याने देशमुख कुटुंबीय मोठ्या आर्थिक अडचणीत सापडलेले आहे त्यांच्या जाण्याचे दुःख आणि कुटुंबात उडवलेले आर्थिक संकट काळात सामजिक बांधिलकी म्हणून मदत फेरी काढण्यात आली.**

आदर्श सरपंच गेल्याने संपूर्ण महाराष्ट्र देशमुख कुटुंबीयांच्या मागे उभे राहत आहे आणि आपापल्या परीने मदत करण्याचा प्रयत्न करीत असताना धारूर शहरांमध्ये देखील मध्ये २७ डिसेंबर रोजी सर्व समाजातील नागरिकांनी एकत्र येऊन मदत फेरी काढून तीन लाख तेरा हजार रुपये जमा केले यावेळी गरिबातील गरीब आणि मोठ्यातील मोठ्या सर्व समाजातील नागरिकांनी मदतीचा हात पुढे करत ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyalokatanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# चिमुकल्या बहिणींच्या अत्याचार अन् हत्येने पुणे हादरले, शिवसेना नेत्या नीलम गोऱ्हे राजगुरूनगरमध्ये

**राजगुरुनगर । प्रतिनिधी**

पुण्याच्या राजगुरुनगरमध्ये शेजारीच वास्तव्यास असणाऱ्या परप्रांतीय ५४ वर्षीय नराधमाने चिमुकल्या मुलींवर अत्याचार करुन खून केल्याची घटना घडली आहे. या घटनेचा सर्वत्र निषेध नोंदवण्यात येत आहे. दरम्यान, शिवसेना नेत्या तथा उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे  या राजगुरूनगरमध्ये पोहचल्या असून  त्यांनी या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे.

राजगुरूनगरमध्ये एका हैवानाने चिमुकल्या बहिणींवर अत्याचार करून अमानुषपणे हत्या केली. या घटनेनं पुणे हादरल्यानंतर विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे थेट राजगुरूनगरमध्ये पोहचल्यात. नराधम आरोपी अजय दासच्या अटकेनंतर पोलीस तपासात आणखी काय-काय समोर आलंय, याची माहिती नीलम गोऱ्हे घेतायेत. त्यानंतर पीडित कुटुंबाची




सांत्वनपर भेट त्यांनी घेतली आहे.

राजगुरूनगरमध्ये एका हैवानाने चिमुकल्या बहिणींवर अत्याचार करून अमानुषपणे हत्या केली. यानिमित्ताने मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आल्याची कबुली विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे दिली. नीलम गोऱ्हे यांनी राजगुरूनगरमध्ये जाऊन नराधम आरोपी अजय दासच्या अटकेनंतर पोलीस तपासात आणखी काय-काय समोर आलंय, याची माहिती गोऱ्हेनी घेतली. त्यानंतर पीडित कुटुंबाची सांत्वनपर भेट घेतली. या कुटुंबाला आर्थिक मदत दिली जाईल, मात्र या मदतीमुळं त्या दोन्ही चिमुकल्या परत येणार नाहीत. त्यामुळं मुळतः ही विकृती ठेवण्याची गरज आहे. यासाठी सरकार कठोर पावले उचलेल, असा विश्वास गोऱ्हेनी व्यक्त केला. आता यापुढं परप्रांतीयांच्या नोंदी ठेवण्याची गरज आहे. सोबतच ते ज्या राज्यातून येतायेत तिथली त्यांची पार्श्वभूमी पाहणं आवश्यक आहे. त्यासोबतच स्थानिकांनी भाडेकरूंच्या नोंदी ठेवण्यासाठी आग्रह धरायला हवा. असं गोरेंनी नमूद केलं. चिमुकल्या बहिणींवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला फाशी व्हायला हवी, यासाठी आम्ही ही पाठपुरावा करू. असं म्हणतानाचं फास्टट्रॅक मध्ये चालणारे खटले पुढे ट्रॅकवर किती फास्ट चालतात, हे पाहणं आणि प्रलंबित प्रकरणं निकाली लावण्यासाठी न्यायालय दोन शिफ्टमध्ये करावीत, अशी मागणी करताना न्यायव्यवस्था सुबक करण्यावर सरकारने भर द्यावा. असं ही गोऱ्हेनी नमूद केलं.

# पैदास कमी करण्यासाठी ४०० कुत्र्यांची केली नसबंदी

**पुणे । प्रतिनिधी**

शिक्रापूर - कुत्रे चावल्यावर होणाऱ्या आणि कुठलाही उपचार उपलब्ध नसलेल्या रेबीजसाठी कुत्र्यांचे रेबीज लसीकरण गरजेचे असून, भटक्या कुत्र्यांची पैदास कमी करण्यासाठी कुत्र्यांची नसबंदीही गरजेची आहे. या दोन्हींवर प्रभावी पर्याय म्हणून शिक्रापूर ग्रामपंचयातीने गावातील तब्बल ४०० कुत्र्यांचे रेबीज लसीकरण व नसबंदी अशी दोन्ही लक्ष्य केवळ दोनच महिन्यांत पूर्ण केली.

या निमित्ताने शिक्रापूर ग्रामपंचायत ही रेबीज व श्वान नसबंदीवर एवढे मोठे काम करणारी जिल्ह्यातील पहिली ग्रामपंचायत ठरली असून, वैद्यकीय क्षेत्रातून त्यांचे कौतुक होत आहे. पिसाळलेल्या कुत्र्याच्या दंशाने माणसांना रेबीज आजार होते.



यावर जगात अद्याप उपचार नाहीत. यासाठी कुत्र्यांमध्ये रेबीज विषाणू तयार होवू नये म्हणून त्यांना रेबीज प्रतिबंधक लसीकरण केले जाते. लसीकरण केले तरच हा आजार नियंत्रणात येवू शकतो. याच पार्श्वभूमीवर शिक्रापूर ग्रामपंचायतीने गेल्या काही महिन्यांपासून सर्व प्रकारच्या कुत्र्यांची धरपकड करून त्यांना रेबीज प्रतिबंधक लसीकरण करण्याचा उपक्रम सुरू केला आहे. यासाठी येथील प्राणीमित्र तथा त्वचा तज्ज्ञ डॉ. ज्योती खाडे यांच्या पुढाकाराने व बकोरी (ता. हवेली) येथील पेट्स फोर्स या संस्थेच्या मदतीने गावातील ४०० श्वानांचे लसीकरण नुकतेच पूर्ण करण्यात आले. याच निमित्ताने गावातील भटक्या कुत्र्यांची पैदास नियंत्रणात आणण्यासाठी त्याच कुत्र्यांची नसबंदीही करून घेतल्याचे सरपंच रमेश गडदे, उपसरपंच पूजा भुजबळ, माजी उपसरपंच सारीका सासवडे यांनी सांगितले.

# १५ वर्षे रखडलेल्या रस्त्याचे काम सुरु

**पिंपरी । प्रतिनिधी**

तब्बल १५ वर्षांनंतर, स्पाईन रस्त्यावरील तळवडे परिसरातील त्रिवेणीनगर चौकाजवळची ५५० मीटर जागा ताब्यात आल्याने महापालिकेच्या स्थापत्य विभागाकडून तेथील रस्ता तयार करण्यातील मोठा अडसर दूर झाला आहे. रखडलेले काम सुरू झाले आहे; मात्र अद्यापि तेथील २५० मीटरचा रस्ता ताब्यात न आल्याने पूर्ण क्षमतेने वाहतूक रहदारी सुरू होणार नसल्याचे चित्र आहे.

पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने स्पाईन रस्ता विकसित केलेल्या कामास १५ वर्षे झाली आहेत. मात्र, त्रिवेणीनगर चौकातील जागा ताब्यात न आल्याने वाहतुकीच्या प्रचंड कोंडीचा सामना वाहनचालकांना दररोज करावा लागत आहे. त्यामुळे लहान-मोठे अपघात घडले आहेत. या कोंडीमुळे वाहनचालकांसह तेथे वावर करणारे नागरिकही वैतागले आहेत. स्पाईन रस्ता ७५ मीटर रूंद आहे. या रस्ता बाधित कुटुंबांना मोशी, प्राधिकरणाची जागा विकत घेऊन प्रत्येकी एक गुंठा जागा देण्याचा विशेष ठराव महापालिकेने मंजूर केला आहे. त्यासाठी महापालिकेने सेक्टर क्रमांक ११ येथे १४ हजार ७५४ चौरस मीटर जागा, १६ कोटी ५२ लाख ११ हजार २०० रूपये देऊन खरेदी केली. सन २०१२ पासून अद्याप १३२ बाधितांना त्या जागेचे वाटप झाले



नसल्याने, त्रिवेणीनगर चौकाजवळील जागा महापालिकेच्या ताब्यात अद्यापि आलेली नाही. जागा ताब्यात घेण्यासाठी नगर रचना विभागाकडून धीम्यागतीने कामकाज सुरू आहे. आतापर्यंत दस्त तसेच, नोंदणी न झाल्याने ही जागा ताब्यात येण्याची प्रक्रिया रखडली आहे. काही बाधितांकडून प्रतिसाद मिळत नसल्याने दस्त नोंद झालेले नाहीत. रस्ता तब्बल १५ वर्षांपासून रखडला असून, अर्धवट स्थितीत आहे. त्यामुळे त्या चौकात वाहतूक कोंडीची समस्या नित्याची झाली आहे. कोंडीमुळे वाहनचालकांची प्रचंड गैरसोय होत आहे. अखेर, एकूण बाधित क्षेत्रापैकी ५५० मीटर जागा तीन महिन्यांपूर्वी महापालिकेच्या ताब्यात आली. त्या ठिकाणी स्थापत्य विभागाकडून रस्ता बनविण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. ते काम ५० टक्के पूर्ण झाले आहे. मंजूर विकास आराखडयानुसार हा रस्ता ७५ मीटर रुंदीचा आहे. संपूर्ण जागा ताब्यात न आल्याने सध्या ३७ मीटर रुंदीचा रस्ता विकसित करण्यात येत आहे. त्यामध्ये १२ मीटर रुंदीच्या दोन लेन, मध्यभागी ९ मीटर रुंदीचा एचसीएमटीआर (रिंग रोड) आणि रस्त्याच्या दोन्ही बाजूस २ मीटर रुंदीचे पेव्ह शोल्डर असे या रस्त्याचे नियोजन आहे. सध्या दुहेरी मार्गाचे २७० मीटर लांबीच्या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

# विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रमानिमित्त पुणे-अहिल्यानगर महामार्गावरील वाहतुकीत बदल

**पुणे । प्रतिनिधी**

पेरणे (ता. हवेली) पेरणे येथे विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रमासाठी दरवर्षी १ जानेवारी रोजी मोठ्या प्रमाणावर अनुयायी येत असतात. अभिवादन कार्यक्रमानिमित्त पुणे-अहिल्यानगर महामार्ग क्र. ६० वर वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी ३१ डिसेंबर २०२४ रोजी सायं. ५:०० वा. पासून ते १ जानेवारी २०२५ रोजी रात्री १२:०० वा. पर्यंत दोन्ही बाजूकडील वाहतुकीत तात्पुरत्या स्वरुपात बदलाचे आदेश प्रभारी जिल्हादंडाधिकारी संतोष पाटील यांनी जारी केले आहेत.

याअंतर्गत चाकण ते शिक्रापूर व शिक्रापूर ते चाकण अशी दोन्ही बाजूकडील





जाणारी-येणारी सर्व प्रकारची वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात येणार आहे. अहिल्यानगर कडून पुणे-मुंबईकडे येणारी जड वाहने ही शिरुर, न्हावरा फाटा, न्हावरा, पारगाव, चौफुला, यवत, हडपसर या मार्गे पुण्याकडे जातील. पुण्याहून अहिल्यानगरकडे जाणारी जड वाहने खराडी बाह्यवळण येथून हडपसरवरुन पुणे-सोलापूर महामार्गाने चौफुला, केडगाव मार्गे न्हावरा, शिरुर-अहिल्यानगर मार्ग अशी वळविण्यात येतील. तसेच सोलापूर महामार्गावरुन आळंदी, चाकण या भागात जाणारी जड वाहने, ट्रक, टेम्पो आदी माल वाहतूक हडपसर, मगरपट्टा, खराडी बाह्यवळणमार्गे विश्रांतवाडीहून आळंदी व चाकण येथे जातील. मुंबईहून अहिल्यानगरकडे जाणारी जड वाहने, ट्रक, टेम्पो आदी माल वाहतूक वडगाव मावळ, चाकण, खेड, मंचर, नारायणगाव, आळेफाटामार्गे अहिल्यानगरकडे जातील. मुंबईहून अहिल्यानगरकडे जाणारी कार, जीप आदी हलकी वाहने वडगाव मावळ, चाकण, खेड, पाबळ, शिरुर मार्गे अहिल्यानगरकडे जातील, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# श्रीक्षेत्र नारायणपूरला दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी

**पुणे । प्रतिनिधी**

मार्गशीर्ष महिन्यातील शेवटचा गुरुवार (दि. २६) निमित्त श्रीक्षेत्र नारायणपूर (ता. पुरंदर) येथील एकमुखी व तीनमुखी श्रीदत्त मंदिरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा'च्या जयघोषात भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.

नारायण महाराज यांच्या कृपाशीर्वादाने व टेंबे स्वामी महाराज यांच्या अधिपत्याखाली मंदिरात विविध कार्यक्रम पार पडले. पहाटे ३ ते ४ वाजता पांडवकालीन नारायणेश्वर (श्रीमहादेव मंदिर) तसेच श्रीदत्त मंदिरामध्ये दही, दूध, पंचामृताने अभिषेक व विधिवत पूजा करण्यात आली. त्यानंतर काकड आरती, धुपारती, पंचारती झाली.



सकाळी साडेनऊ ते १० पर्यंत आरती झाली. १० ते दुपारी दीड वाजता भजनाचा कार्यक्रम झाला. दुपारी २ पर्यंत टेंबे स्वामी महाराज यांचे प्रवचन झाले. या वेळी भाविकांनी गुरुदेव दत्तांचा जयघोष करीत पुष्पवृष्टी केली. अडीच वाजता आरती झाली. चारवाजेपर्यंत भाविकांनी दर्शन व महाप्रसादाचा लाभ घेतला. रात्री ८ ते साडेआठपर्यंत आरती झाली. १० वाजता दत्त महाराजांची पादुका पालखीत ठेवून मंदिर प्रदक्षिणा झाली. साडेदहा वाजता आरतीनंतर सांगता झाल्याचे दत्त मंदिराचे व्यवस्थापक भरतनाना क्षीरसागर यांनी सांगितले. मध्य प्रदेशचे माजी आमदार पांचीलाल मेढा (महेश्वर), पिंपरी-चिंचवडचे माजी महापौर राहुल जाधव, पंढरपूरचे सर्जेराव पवार, डॉ. उमेश डोंगरे, तात्यासाहेब भिंताडे, गंगाराम जगदाळे, पंडित साबळे, बबनराव टकले, एम. के. गायकवाड, सरपंच प्रदीप बोरकर, रामभाऊ बोरकर, बाळासाहेब डांगे, चंद्रकांत बोरकर, दादा भुजबळ, अजित बोरकर, तात्या बोरकर, सदानंद बोरकर, बाळासाहेब गायकवाड, दिगंबर भिंताडे आदी या वेळी उपस्थित होते.

# पुणे शहरातील अपघातांवर कडक कारवाईसाठी शिवसेनेचे निवेदन



**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरातील वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर शिवसेना पुणे शहराच्या वतीने सहाय्यक पोलीस आयुक्त विठ्ठल दबडे यांना निवेदन देण्यात आले. शहरातील अवजड वाहनांमुळे होणाऱ्या अपघातांवर तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.


वाघोली येथील दुर्दैवी डंपर अपघातामध्ये मृत्यूमुखी पडलेल्या निष्पाप जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी शिवसेना नेहमीच त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहील, असे यावेळी सांगण्यात आले. संबंधित जबाबदार व्यक्तींवर कठोर गुन्हे दाखल करण्यात यावेत आणि त्यांच्या विरोधात तात्काळ कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली. याप्रसंगी शिवसेना पुणे शहर समन्वयक शंकर संगम, पर्वती विधानसभा संघटक आशुतोष शेंड्गे, कसबा विधानसभा विभाग प्रमुख निलेश जगताप, शाखाप्रमुख महेश गवसे तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# भंगाराच्या दुकानात स्फोट; एक जण मृत्युमुखी, तीन जण गंभीर जखमी

**पुणे । प्रतिनिधी**

बी टी कवडे रस्ता येथील सानिया स्क्रॅब सेंटर भंगाराच्या दुकानात स्फोट झाल्यामुळे एक जण मृत्युमुखी तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. जवळपास तीन ते चार किलोमीटर अंतरावर या स्फोटाचा आवाज ऐकू आला त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार संध्याकाळी साडेपाचच्या दरम्यान बी टी कवडे रोड येथे मोठ्या आवाज होऊन स्फोट झाल्यामुळे नागरिक घाबरले. यावेळी या परिसरातील दुकानांमध्ये जुन्या फ्रिजमधील कॉम्प्रेसर काढताना गॅसची गळती होऊन स्फोट झाला. यामध्ये मेहबूब शेख (वय ५०)



कामगाराचा मृत्यू झाला. तसेच दिलीप मिसाळ (वय ४०), किशोर साळवे,(वय४०) दोन कामगार आणि भंगाराच्या दुकानाचा मालक महमंद सय्यद( वय ५० ) हे सर्व गंभीर जखमी झाले आहेत. सर्वजण रामटेकडी परिसरात राहणारे आहेत. बीटी कवडे रोड येथे अनेक वर्षांपासून सानिया स्क्रॅब सेंटर येथे भंगार गोळा करून विक्री करण्याचे काम सुरू आहे. यादरम्यान भंगारातील वस्तूंचे विल्हेवाट लावून त्यातील महत्त्वाच्या वस्तूचे विभाजन करून विक्री करत असे. आजही चौघेजण गप्पा मारत दुपारी जुन्या फ्रिजमधून कॉम्प्रेसर काढण्याचे काम सुरू होते. अंदाज न आल्याने त्याचा स्फोट होऊन मेहबूब शेख यांचा मृत्यू झाला.

# पुणे बार असोसिएशनच्या वार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

**पुणे । प्रतिनिधी**

वकिलांची शिखर संघटना असलेल्या पुणे बार असोसिएशनच्या २०२५-२६ या वार्षिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. ३१ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत शिवाजीनगर न्यायालय आवारात मतदान होणार आहे. त्याच दिवशी सायंकाळी ६.३० वाजता मतमोजणीस होणार असून, रात्री उशिरा निकाल जाहीर होईल, अशी माहिती मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. गिरीश शेडगे आणि ॲड. विजयराज दरेकर यांनी दिली.

अतिरिक्त निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ॲड. अमोल जाधव, ॲड. अनिल ऊर्फ अण्णासाहेब पवार, उप निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून




ॲड.प्रविण येसादे, ड. सुप्रिया कोठारी, ॲड.सचिन झालटे पाटील, ॲड.अतुल आर.पाटील, तर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ॲड.संदेश जायभाय, ॲड.प्रभाकर सोनावणे, ॲड.रामचंद्र चांदारे, ॲड.विकास उंद्रे, ॲड.हेमंत भांड, ॲड.कादंबरी दौंडे आणि ॲड.सचिनकुमार गेलडा काम पाहणार आहेत. निवडणूकीसाठी मतदान करणाऱ्या वकिलांची अंतिम मतदार यादी ही प्रसिध्द झाली आहे. पुणे बार असोसिएशनचे ७ हजार ८३८ कायमस्वरूमी सभासद आणि २८२४ वार्षिक सभासद निवडणूकीमध्ये मतदानाचा हक्क बजावणार आहेत. उमेदवारी नामांकन अर्ज वाटप व स्विकृती १ ते ३ जानेवारी २०२५ या कालावधीत न्यायालयातील पुणे बार असोसिएशनच्या कार्यालयात सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत होणार आहे. ४ जानेवारी रोजी अर्जांची छाननी होणार आहे. ७ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज माघारी घेता येणार आहे. याच दिवशी सायंकाळी ५ नंतर अंतिम उमेदवारांची यादी जाहीर करण्यात येणार आहे. २८ जानेवारी रोजी दुपारी ४ ते सायंकाळी ६ या वेळेत अशोका हॉल येथे उमेदवारांचे मनोगत असणार आहे. अध्यक्ष पदासाठी अनामत रक्कम २० हजार रुपये आहे. उपाध्यक्ष पदासाठी १५ हजार, सचिव पदासाठी १० हजार, खजिनदार, ऑडीटर पदासाठी ७ हजार, कार्यकारिणी सदस्य पदासाठी ३ हजार रुपये अनामत रक्कम आहे.

# जेजुरीत ३० डिसेंबरला सोमवती यात्रा; पालखी सोहळा सोमवारी होणार कऱ्हा स्नानासाठी मार्गस्थ

**जेजुरी । प्रतिनिधी**

बहुजन समाजाचा लोकदेव असणार्या जेजुरीच्या खंडोबा देवाची सोमवती यात्रा सोमवारी (दि. ३०) भरणार आहे. सोमवारी दुपारी १ वाजता श्री खंडोबा देवाचा पालखी सोहळा गडावरून कर्हा स्नानासाठी मार्गस्थ होणार आहे.

यात्रेच्या नियोजनासाठी जेजुरीच्या ऐतिहासिक छत्री मंदिरात श्री खंडोबा पालखी सोहळा समिती मानकरी, खांदेकरी समस्त ग्रामस्थ मंडळ, श्री मार्तंड देवसंस्थान यांच्या वतीने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत दि. ३० रोजी सोमवती अमावास्येनिमित्त भरणार्या यात्रेच्या निमित्ताने दुपारी १ वाजता श्री खंडोबा देवाच्या पालखी सोहळ्याचे गडावरून प्रस्थान होईल. पालखी सोहळा कर्हा नदीवर पोहचल्यानंतर उत्सवमूर्तींना कर्हा स्नानाचा धार्मिक विधी होईल, अशी माहिती देवाचे मानकरी इनामदार राजेंद्र पेशवे यांनी सांगितले. श्री मार्तंड देवसंस्थानच्या वतीने मानकरी, पालखी सोहळ्याचे खांदेकरी, भाविक यांच्यासाठी विविध सुविधा देण्यात येणार आहेत. धालेवाडी रेल्वे गेटवर पाच हजार भाविकांना अल्पोपहार व चहा-पाण्याची व्यवस्था, पालखी सोहळा गडावर पोहचल्यावर



खांदेकरी, मानकरी यांच्यासाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे, असे देवसंस्थानचे प्रमुख अभिजित देवकाते यांनी सांगितले. श्री मार्तंड देवसंस्थानने ग्रामदेवता जानाई देवी मंदिराच्या बांधकामाची जबाबदारी घेतली आहे. ३० जानेवारीअखेर मंदिराचे काम पूर्ण करावे, गोकर्ण महाबळेश्वर येथे ग्रामदैवता जानाई देवीच्या मूर्तीचे काम सुरू आहे. कलशाचे कामही लवकरच सुरू करण्यात येणार आहे. या कामासाठी ग्रामस्थांनी आर्थिक सहकार्य करावे, असे आवाहन जानाई देवी ट्रस्टचे प्रमुख सुधीर गोडसे यांनी सांगितले. पुढील वर्षी सोमवती यात्रेची पर्वणी नसल्याने दि. ३० रोजी होणार्या यात्रेसाठी मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. कर्हा नदीवर उत्सवमूर्तींना स्नान घालताना सुरक्षिततेच्या बाबतीत काळजी घ्यावी, यात्रेत भेसळयुक्त भंडारा विक्री करणार्यांवर कारवाई करावी, अशी मागणी खंडोबा पालखी सोहळा ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे यांनी केली.

या बैठकीला सचिन पेशवे, कृष्णा कुदळे, छबण कुदळे, गणेश आगलावे, रोहिदास माळवदकर, संतोष खोमणे, अरुण खोमणे, रामदास राऊत, शैलेश राऊत, राजाभाऊ चौधरी, अनिल झगडे, पंडित हरपळे, पुरोहित शशिकांत सेवेकरी, योगेश खाडे, गिरीष झगडे आदींसह जेजुरी देवसंस्थानचे विश्वस्त मंगेश घोणे, पोपट खोमणे, व्यवस्थापक आशिष बाठे, बाळासाहेब खोमणे, गणेश डिखळे, महेश नानेकर उपस्थित होते.